follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

⁘ RNI Regd. No. 72105/99 ⁘ वर्ष २५ ⁘ अंक २०६ ⁘ सातारा ⁘ गुरुवार, दि. ४ एप्रिल २०२४ ⁘ पाने ६ (सुप्रभात) ⁘ किंमत ५/- रूपये

### राज ठाकरे यांची तोफ शिवाजी पार्कवर धडाडणार

**मुंबई :** मनसेने गुढी पाडवा मेळाव्याची जोरदार केली आहे. नुकताच गुढीपाडवा मेळाव्याचा टीझर लॉन्च करण्यात आला आहे. त्यात राज ठाकरे यांचे भाषण करतानाचे व्हिज्युअल्स, श्रोत्यांची गर्दी दाखवण्यात आली आहे.

राजकारणाची झाली दशा, राजविचार दाखवणार महाराष्ट्राला दिशा, असे या टीझरमध्ये म्हटले आहे. तसेच महाराष्ट्रालाच नव्हे तर राजकारणालाही नवनिर्माणाची गरज असल्याचेही या टीझरमध्ये म्हटले आहे.

# उद्धव ठाकरे गटाचे २१ उमेदवार जाहीर

**मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने आतापर्यंत २१ उमेदवारांची घोषणा केली आहे. शिवसेना ठाकरे गटाने आज उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली असून यामध्ये चार नावांचा समावेश आहे. त्याआधी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारांच्या पहिल्या यादीत १७ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली होती. आतापर्यंत ठाकरे गटाने २१ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत.**



उद्धव ठाकरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत चार उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. यामध्ये बहुचर्चित लढत असलेल्या कल्याण मतदारसंघातील उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात ठाकरे गटाने वैशाली दरेकर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. हातकणंगलेमधून सत्यजित पाटील आणि पालघरमधून भारती कामडी यांना उमेदवारी जाहीर करण्यता आली आहे. तर नुकतेच उन्मेष पाटील यांच्यासोबत भाजपमधून ठाकरे गटात पक्षप्रवेश केलेले करण पवार यांना जळगावमधून लोकसभेचे तिकीट दिले आहे.

### राजू शेट्टींनी 'मातोश्री'वर भेट घेऊनही हातकणंगलेत उमेदवार का दिला?

**राजदंड / कोल्हापूर**

महाविकास आघाडीमध्ये अत्यंत कळीचा मुद्दा झालेल्या हातकणंगले आणि सांगली लोकसभा मतदारसंघांमध्ये ठाकरे गटाकडून उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. सांगली लोकसभेच्या जागेवरून काँग्रेस आणि ठाकरे गटांमध्ये वाद-विवाद सुरू असतानाच आता आपण हातकणंगले लोकसभा मतदारसंघांमध्ये राजू शेट्टी यांनी पाठिंबा मागूनही ठाकरे यांनी न देता थेट उमेदवार जाहीर केला आहे. ठाकरे गटाकडून माजी (पान २ वर)

### शिवसेना ठाकरे गटाचे २१ शिलेदार :

- बुलढाणा - नरेंद्र खेडेकर
- यवतमाळ-वाशिम - संजय देशमुख
- मावळ - संजोग वाघेरे-पाटील
- सांगली -चंद्रहार पाटील
- हिंगोली - नागेश पाटील आष्टीकर
- छत्रपती संभाजीनगर - चंद्रकांत खैरे
- धाराशिव - ओमराजे निंबाळकर
- शिर्डी- भाऊसाहेबर वाघचौरे
- नाशिक - राजाभाई वाजे
- रायगड - अनंत गीते
- सिंधुदुर्ग-रत्नागिरी - विनायक राऊत
- ठाणे - राजन विचारे
- मुंबई-ईशान्य - संजय दिना पाटील
- मुंबई-दक्षिण - अरविंद सावंत
- मुंबई-वायव्य - अमोल कीर्तिकर
- परभणी - संजय जाधव
- मुंबई दक्षिण मध्य - अनिल देसाई
- वैशाली दरेकर : कल्याण
- सत्यजित पाटील : हातकणंगले
- करण पवार : जळगाव
- भारती कामडी : पालघर

# हवेली तालुक्यात सशस्त्र दरोडा

## १६ लाख ३० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम लुटली

**राजदंड / लोणी काळभोर**

हवेली तालुक्यातील बिवरी गावात मंगळवारी मध्यरात्री सशस्त्र दरोडा टाकल्याची घटना उघडकीस आली आहे. दरोडेखोरांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवत तब्बल १६ लाख ३० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने रोख रक्कम लुटली आहे. मंगळवारी मध्यरात्री पावणे दोन ते दोन वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली आहे. या सशस्त्र दरोड्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली असून पोलिसांपुढे या दरोडेखोरांना गजाआड करण्याचे आव्हान उभे राहीले आहे.

या प्रकरणी प्रशांत विलास गोते (वय ४०, रा. मु. बिवरी, पो. नायगाव, ता. हवेली) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात दरोडेखोरांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास करे यांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गोते आणि त्यांचे कुटुंबीय रात्री जेवण करून घरामध्ये झोपलेले होते. मध्यरात्री पावणे दोन वाजण्याच्या सुमारास सात अनोळखी व्यक्ती त्यांच्या घराजवळ आल्या. त्यांनी मुख्य प्रवेशद्वाराचा दरवाजा कटावणीने उघडला व हत्यारांसह घरामध्ये प्रवेश केला.

या सर्व आवाजामुळे घरातील लोक जागे झाले. या सर्वांच्या गळ्याला चाकू लावून त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर घरातील बेडरूममधील कपाटात असलेली पाच लाख रुपयांची रोकड आणि सोन्याचे दागिने जबरदस्तीने काढून घेतले. यासोबतच फिर्यादी गोते यांची पत्नी, आई, बहीण यांच्या गळ्याला चाकू लावून त्यांचा गळा कापण्याची धमकी दिली. गळ्यातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने काढून घेतले. तसेच, ओढून काढले. त्यांच्या बहिणीला मारहाण करण्यात आली. आईला तोंडावर जबर मारहाण करून कानाला आणि तोंडाला दुखापत करण्यात आली.

दरोडेखोरांनी एकूण १६ लाख ३० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोकड दरोडा घालून चोरून नेली. पळून जात असताना चोरट्यांनी पोलिसांना फोन करू नये म्हणून फिर्यादी यांच्या घरातील सर्वांचे फोन घेऊन ते फोडून टाकले. त्यानंतर आरोपी पसार झाले.

# सोलापूर एमआयडीसीतील टॉवेल कारखान्याला भीषण आग!

**राजदंड / सोलापूर**

सोलापूर येथील अक्कलकोट रोडवरील एमआयडीसीतील अन्नपूर्णा टॉवेल कारखान्याला आज सकाळी भीषण आग लागली असून आगीचे अद्यापही कारण समजले नाही. सध्या घटनास्थळी अग्निशमन दलाच्या १५ गाड्या दाखल झाल्या असूनही आगीवर नियंत्रण मिळालेले नाही.



सोलापूर अग्निशामक विभाग घटनास्थळी दाखल झाला असून आग विझविण्याचे त्यांचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. कारखान्यात टॉवेल व कच्चा माल असल्याने आगीचा भडका कायम असून परिसरात धुराचे लोट पसरले आहेत. त्याठिकाणी बघ्यांची मोठी गर्दी त्याठिकाणी जमली आहे. ही आग पसरणार नाही, याची खबरदारी अग्निशामक विभागाकडून घेतली जात आहे.

आतापर्यंत लाखोंचा माल आगीत भस्मसात झाला आहे. पूर्णपणे आग विझायला आणखी काही तास लागणार असल्याचे अग्निशामक विभागप्रमुख केदार आवटे यांनी सांगितले.

# आर्थिक लाभासाठी २५ लाखांस जिवंत शंख खरेदी करणे पडले महागात

## महाराजासह पाचजणांविरूद्ध गुन्हा दाखल

**राजदंड / सोलापूर**

हिंदू संस्कृतीत धार्मिक पूजापाठासाठी शंखाचा उपयोग शुभ मानला जातो. परंतु, सोलापुरात जिवंत शंख आर्थिक लाभ मिळवून देतो, अशी भुरळ पाडून एका शेतकऱ्याला जिवंत शंख मिळवून देण्याच्या नावाखाली २५ लाख रूपयांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी एका तथाकथित महाराज आणि महिलेसह पाचजणांविरूद्ध पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

सांगोला तालुक्यातील खिलारवाडी येथे २१ ते २४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान हा प्रकार घडला असून फसवणूक झालेल्या तरूणाचे नाव सचिन हरिदास यादव (वय ३६, रा. खिलारवाडी) असे आहे. यादव हे शेतकरी असून संभाजी ब्रिगेड या सामाजिक संघटनेचे शाखा अध्यक्ष आहेत. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मेघराज अवताडे ऊर्फ बाबा पाटील, सूरज पोपट पारसे ऊर्फ पारसे महाराज (दोघे रा. फळवणी, ता. माळशिरस), अनिल मोरे, सलीम (पूर्ण नाव नाही.) आणि ३० वर्षांची अनोळखी तरूणी यांच्या विरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

सचिन यादव यांना ओम कोरे (रा. लातूर) हे सांगोला तालुक्यातील महूद येथे भेटले. त्यांनी मेघराज अवताडे ऊर्फ



बाबा पाटील यांच्याकडे २५ लाख रूपये किंमतीत जिवंत शंख उपलब्ध असल्याची माहिती दिली आणि जिवंत शंख दुसऱ्या व्यक्तीला विकला तर दुप्पट लाभ मिळतो, अशी भुरळही पाडली. त्यानुसार मेघराज अवताडे याच्याशी संपर्क साधून त्यास महूद येथे बोलावून घेतले. मेघराज याने सोबत आणलेला जिवंत शंख सचिन यादव यांना दाखविला. या जिवंत शंखावर दूध ओतले असता त्याच्या खालील बाजूला दही निघत होते. हा जिवंत शंख ५० किलो तांदळाखाली ठेवल्यास तो तांदळाच्या ढिगा-यातून आपोआप बाहेर येतो, अशी खात्री करून देताना हा जिवंत शंख विकत देताना पूजापाठ करावा लागतो, असे मेघराज अवताडे यांनी सांगितले.

या जिवंत शंखामुळे आर्थिक लाभ मिळतो म्हणून भुरळ पडलेल्या सचिन यादव यांनी मित्र, नातेवाईकांकडून उसनी रक्कम घेऊन आणि बँक कर्ज काढून २५ लाख रूपये गोळा केले आणि ही रक्कम मेघराज अवताडे यास दिली. त्यानंतर जिवंत शंख देण्यापूर्वी त्याची पूजा करावी लागते, अशी सबब पुढे करून सचिन यादव यांना फळवणी गावात पारसे महाराजांकडे नेण्यात आले. तेथे महाराजांच्या सेवेसाठी असलेल्या एका तरूणीने महाराज खूप कडक उपासना करतात. त्यांना पूजेसाठी म्हणून ५० हजार रूपये काढून घेतले. मात्र नंतर तांत्रिक कारणांमुळे जिवंत शंखाची पूजा दोन दिवसांनी मुहूर्तावर करण्याचे ठरले. जिवंत शंख मेघराज अवताडे याच्याच ताब्यात होता. परंतु, नंतर संपर्क करून मेघराज भेटत नव्हता. शेवटी पारसे महाराजांच्या भेटीतून हा संपूर्ण प्रकार फसवणुकीचा असल्याचे आढळून आले.

# सातार्‍यात शरद पवार गटाकडून आ. शशिकांत शिंदे हे आघाडीवर

**राजदंड / सातारा**

राज्यामध्ये अजून एकही उमेदवार घोषित करण्यात आलेला नाही अशा जागेमध्ये सातारा लोकसभा मतदारसंघाचा समावेश आहे. त्यामुळे सातारा लोकसभेला उमेदवार कोण असणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सातारमध्ये गेल्या काही दिवसांमध्ये ज्या पद्धतीने महायुतीमध्ये उमेदवार कोण असणार? याची चर्चा रंगली आहे, अगदी त्याच पद्धतीने महाविकास आघाडीकडून सुद्धा सातारमध्ये उमेदवार कोण असणार? याची सुद्धा चर्चा रंगली आहे.

साताराची जागा ही शरद पवार गटाच्या वाट्याला असून उमेदवार अजूनही निश्चित झालेला नाही. महायुतीकडून भाजपचे राज्यसभा खासदार उदयनराजे भोसले यांची उमेदवारी निश्चित मानण्यात येत असली, तरी अजून त्यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आलेली नाही. या सर्व पार्श्वभूमीवर सातारमध्ये उमेदवारीची प्रतीक्षा अजूनही कायम आहे. दरम्यान, सातारा दौऱ्यामध्ये शरद पवार यांनी प्रकृतीच्या कारणास्तव खासदार श्रीनिवास पाटील निवडणुकीच्या रिंगणात उतरणार नसल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे राजकीय भूवया उंचावल्या गेल्या होत्या.

यावेळी बोलताना त्यांनी मात्र राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून शशिकांत शिंदे, आमदार बाळासाहेब पाटील, सत्यजित



पाटणकर, सुनील माने अशी नावे चर्चेत असल्याचे सांगितले होते. मात्र, आता समोर आलेल्या माहितीनुसार बाळासाहेब पाटील यांनी निवडणूक लढवण्यासाठी नकार दिल्याचे समजते. दरम्यान, या घडामोडी घडत असतानाच शरद पवार यांनी मोठी खेळी करताना थेट माजी मुख्यमंत्री काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनाच तुतारीच्या चिन्हावर लढवण्यासाठी गळ घातली होती. मात्र, त्यांनी लोकसभा निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली मात्र तुतारी चिन्हावर असमर्थता दर्शवल्यानंतर चर्चा पुढे जाऊ शकले नसल्याचे समजते.

त्यामुळे आता शरद पवार गटाकडून भक्कम उमेदवारांचा शोध सुरू आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आता शशिकांत शिंदे यांचे नाव समोर आल्याचे समजते. शशिकांत शिंदे यांनी आदेश आल्यास निवडणुकीसाठी तयारी दर्शवल्याचे समजते. दरम्यान, जयंत पाटलांनी शशिकांत शिंदे यांना तुम्हाला निवडणूक लढावी लागेल, असा निरोप दिल्याचे सुद्धा समजते. त्यामुळ सातारच्या रिंगणामध्ये उदयनराजे विरुद्ध शशिकांत शिंदे असा मुकाबला रंगणार का? अशी सुद्धा चर्चा आहे.

दरम्यान मुंबईमध्ये आज महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठकीमध्ये सातारच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीच्या बैठकीत आज सातारच्या जागेवर सुद्धा चर्चा होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे आज तरी सातारच्या जागेची घोषणा होणार का? याकडे आता सातारा जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे.

## सोन्याच्या दराचा नवा उच्चांक

**मुंबई :** सोन्याची खरेदी करणाऱ्या ग्राहकंसाठी निराशाजनक बातमी आहे. कारण आज सोन्याच्या दरानं नवा उच्चांक गाठला आहे. आज सराफा बाजारात सोन्याचा दर हा ७१ हजार ६०० वर पोहोचला आहे. मुंबईत १० ग्राम सोन्याची खरेदी करण्यासाठी ७१ हजार ६०० रुपये मोजावे लागत आहेत. दरम्यान, मागील ३ ते ४ दिवसात सोन्याच्या दरात मोठी वृद्धी झाल्याचं पाहायला मिळत आहे.

दिवसेंदिवस सोनं अधिकच महाग होत आहे. यामुळं खरेदीदारांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. ७१ हजार ६०० हा सोन्याला आत्तापर्यंत मिळालेला (पान २ वर)

# चारित्र्यहनन मुद्द्यावर प्रणिती शिंदेंना राम सातपुतेंनी फटकारले

**राजदंड / सोलापूर**

विरोधक खोटे आरोप करुन माझं चारित्र्यहनन करतील, असा आरोप सोलापूरच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदेंनी विरोधकांवर केला होता त्यांच्या या आरोपाला राम सातपुतेंनी काय प्रत्युत्तर दिले आहे. आम्ही संस्कारी असून आमच्यावर असले संस्कार नाहीत, असे सांगत त्या आमच्या भगिनी आहेत, त्यांनी फालतू गोष्टींवर बोलण्यापेक्षा विकासावर बोलावे, मी फक्त विकासावरच बोलत असल्याचं प्रत्युत्तर भाजप उमेदवार राम सातपुतेंनी दिले आहे.

येत्या काही दिवसांत माझं चारित्र्यहनन करणारे फोटो, पोस्ट दाखवल्या जातील, माझी बदनामी केली जाईल, असा संशय काँग्रेस उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांनी जाहीर कार्यक्रमात बोलून दाखवला यानंतर चर्चेला उधाण आलं होतं. यावर कडक शब्दांत प्रतिक्रिया देताना आम्ही संस्कारी असून आमच्यावर असले संस्कार नाहीत, असं सांगत त्या आमच्या भगिनी आहेत, त्यांनी फालतू गोष्टींवर बोलण्यापेक्षा विकासावर बोलावे, मी फक्त विकासावरच बोलत असल्याचे उत्तर भाजप उमेदवार राम सातपुते यांनी दिले आहे.

दरम्यान, मंगळवार सकाळपासून (पान २ वर)

# बारामती लोकसभेत नणंद - भावजयची लढत, लढतीकडे देशाचे लक्ष...!

**रूपेश जाधव**

- **दोन्ही गटाकडून भावनिक राजकारण, तर पवार कुटुंबातील वाद चर्चेत...**
- **बारामती लोकसभा निवडणूक ठरणार अजित पवार यांच्या राजकीय भविष्याची, तर शरद पवार यांच्या प्रतिष्ठेची...**

**राजदंड / भोर**

राजकारणातील केंद्रबिंदू असणारे मात्र पक्ष फुटी नंतर ह्या ना त्या कारणाने चर्चेचा विषय ठरले असलेले पवार कुटुंबीयांचा निवडणुकांचे पडघम वाजताच कौटुंबिक वाद चर्चेत आला असून बारामती लोकसभा निवडणुकीत खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार नणंद भावजय अशी घरातच लढत होणार असल्याने याकडे राज्यासह देशाचे लक्ष लागले असले तरी ही लढत शरद पवार विरोधात अजित पवार अशी काका पुतण्यामध्येच असल्याचे चित्र असून अजित पवार यांच्या राजकीय भविष्याची तर शरद पवार यांच्या प्रतिष्ठेची मानली जात आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघ हा गेल्या अनेक वर्षांपासून पवारांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो व तो अभेद्द राहिला आहे. या बालेकिल्ल्याला खिंडार पाडण्यासाठी भाजपा ने अनेक वेळा विविध युक्त्या वापरल्या मात्र भाजपाच्या या रणनितीला पवारांच्या एक छत्री अमलामुळे यश आले नाही. अखेर लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी पवार कुटुंबात दुही निर्माण झाल्याने भाजपा साठी मोठे अनुकूल वातावरण या





लोकसभा मतदारसंघात तयार झाले आहे. भाजपाच्या सोबत सत्तेत असलेल्या उपमुख्य मंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनाच सुप्रिया सुळे यांच्या विरोधात उमेदवारी जाहीर करुन भाजपा ने शरद पवार यांना घरचा आहेर दिल्याचे सर्व सामन्यात बोलले जात आहे.

अजित पवार यांना कोणत्याही परिस्थितीत बारामतीची जागा जिंकण्याचा निर्धार केला असून त्यादृष्टीने त्यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातील बारामतीसह इंदापूर, दौंड, पुरंदर, भोर, वेल्हा खडकवासला या मतदारसंघामध्ये मोर्चे बांधणी सुरु केली आहे.खासदार सुप्रिया सुळे यांच्यासाठी ही निवणूक आव्हानात्मक असली तरी मोठ्या आत्मविश्वासाने त्या या मतदार संघात आपला झंझावती प्रचार करत आहेत.

एकंदरीत २०२४ च्या लोकसभा निवडणुकिकडे देशाचे लक्ष लागले असले तरी बारामती लोकसभा मतदारसंघ नणंद भावजय च्या संभाव्य लढतीमुळे देशात चर्चेत आला आहे. या मतदार संघातील बड्या बड्या नेत्याना आपल्याकडे खेचण्यासाठी दोन्हीं गटाकडून मोठी रणनिती आखली जात असून या रणनिती मध्ये कोणते बडे नेते आडकणार हे येत्या काही दिवसांमध्ये स्पष्ट होणार आहे.

गेल्या काही दिवसांपासुन बारामती लोकसभा मतदारसंघाची जागा चर्चेची होती. सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीची घोषणा झाली की बारामतीत ठिणग्या पडण्यास सुरुवात झाली. पक्ष आणि चिन्ह अजित पवार यांना मिळाल्यानंतर अजित पवार यांनी सातत्याने शरद पवार व सुप्रिया सुळे यांच्यावर टीका केली. या टीकेचे पडसाद कुटुंबियामध्ये देखिल उमटले गेल्याने अजित पवार यांचे सख्खे भाऊ श्रीनिवास पवार व पुतणे युगेंद्र पवार विरोधात गेले. बारामती लोकसभा निवडणुकीत सूनेत्रा पवार यांची उमेदवारी निश्चित केल्यानंतर अजित पवार यांनी सातत्याने शरद पवार सर्वांना भावनिक करतील असा आरोप करत वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यानंतर ते स्वतःच भावनिक वातावरण करताना दिसून आले. ''कुटुंबाने मला एकटं टाकले आहे, तुम्ही मला एकटं टाकू नका''. असा भावनिक प्रचार करताना दिसून आले आहेत.

या लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व गेल्या अनेक वर्षांपासून केलेले ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मानणारा मोठा गट असून ही सुप्रिया सुळे यांच्यासाठी जमेची बाजू आहे. तर इंदापूरचे माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील महायुती मध्ये असल्याने कदाचित ते युतीचा धर्म पळतील. अशी शक्यता आहे. दौंड विधान सभा मतदार संघामध्ये भाजपाचे माजीआमदार राहुल कुल यांचे वर्चस्व आहे. (पान २ वर)

### मैदानातील नेते अनंतराव थोपटे यांच्या निवासस्थानी...

**बारामती लोकसभा निवडणुकीत भोर विधानसभा मतदार संघाला विशेष महत्व आलेले असून माजी मंत्री अनंतराव थोपटे यांच्या गाठीभेटीचा सिलसिला वाढला आहे. त्यांचे आशिर्वाद घेण्यासाठी दिग्गजांची रिघ लागली आहे. बारामती लोकसभा निवडणुक जाहीर झाली असून विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात सुनेत्रा पवार असा नणंद भावजय सामना रंगणार आहे. गेल्या महिनाभरात राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, उमेदवार खासदार सुप्रिया सुळे, अजित पवार गटाच्या उमेदवार सुनेत्रा पवार, माजी मंत्री विजय शिवतारे, अध्यक्ष सुनील तटकरे, रोहित पवार यांनी संगमनेर येथील घरी जाऊन अनंतराव थोपटे यांची भेट घेतली असल्याने त्यांना ह्या वयातही आजही राजकारणातील केंद्रबिंदू मानले जात आहेत.**

# महायुतीच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी तीन मेळावे घेणार

## पालकमंत्री शंभूराज देसाई यांची बैठकीनंतर माहिती

**राजदंड / सातारा**

महायुतीचा उमेदवार सातारा लोकसभा मतदार संघातून उच्चांकी मतदानाने निवडून दिला जाईल त्यासाठी जिल्हयात सातारा कराड वाई येथे घटक पक्षांचे कार्यकर्ता मेळावे घेतले जाणार आहेत अशी माहिती जिल्हयाचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी पत्रकार परिषदेत दिली. निवडणुकीत महायुतीचा घटकपक्ष असलेल्या आरपीआयला (आठवले गट) सत्तेचा वाटा मिळत नाही. मागण्यासंदर्भात निर्णय होत नाही तोपर्यंत तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला असल्याचे आरपीआय जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड यांनी सांगितले.

साताऱ्यात महायुतीतील घटक पक्षांची बैठक पार पडली. बैठकीस आ. शिवेंद्रराजे भोसले, आ. महेश शिंदे, भाजपचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, डॉ. अतुल भोसले, मनोज घोरपडे, अमित कदम, विक्रमबाबा पाटणकर, चंद्रकांत पाटील, सुरभी भोसले, शारदा जाधव, अशोक गायकवाड, सुनील काटकर, पंकज चव्हाण, काका धुमाळ, विकास गोसावी, विठ्ठल बलशेटवार आदि प्रमुख उपस्थित होते.

### किमान डोळा तरी मारा - खा. उदयनराजे

**खा. श्री. छ. उदयनराजे भोसले हेही बैठकीच्या ठिकाणी उपस्थित होते. मात्र पदाधिकार्यांना उशिर झाल्याने खा. उदयनराजे कामानिमित्त बाहेर पडले. खा. उदयनराजेंचा पेहराव यावेळी हटके होता. त्यावरुन ते म्हणाले माझा लूक चांगला असल्याने निदान डोळा तरी मारा. मी डोळा मारला तर त्याचा वेगळा अर्थ घेतला जाईल, अशी मिश्कीली त्यांनी केली. तुमच्या चेहर्यावरचे हास्य बरेच काही सांगून जात आहे, याकडे लक्ष वेधले असता खा. उदयनराजे म्हणाले, जो ताण घेतो त्याच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्याला रक्तदाबाचा त्रास सुरु होतो असे ते म्हणाले.**

बैठकीत विविध घटक पक्षांच्या पदाधिकार्यांची मत मतांतरे जाणून घेण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या तयारीसंदर्भात काही जणांनी सुचना केल्या. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना पालकमंत्री शंभूराज देसाईम्हणाले, लोकसभा निवडणुकीच्या तयारीच्या नियोजनासाठी बैठक घेण्यात आली. राज्यातील नेत्यांकडून येणार्या आदेशाचे तंतोतंत पालन सर्व पक्षांनी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दि. ८ रोजी विधानसभा मतदारसंघ निहाय कार्यकर्ता मेळावे घेण्यात येणार आहेत. मात्र त्याची सुरुवात बुधवारपासून ठाण्यातून होत आहे. कराड उत्तर, कराड दक्षिण व पाटण विधानसभा मतदारसंघाचा मेळावा कराड येथे होणार आहे. सातारा, कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचा मेळावा सातारा येथे तर महाबहेश्वर-वाई-खंडळा या मतदारसंघाचा मेळावा वाई येथे घेण्यात येणार आहे. घटक पक्षांचे मेळावे घेण्यात येणार आहेत. उमेदवारी जाहीर होण्याची वाट न पाहता महायुतीचे काम सर्वांनी मिळून करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

महायुतीच्या बैठकीला बरेच पदाधिकारी नव्हते, याकडे लक्ष वेधले असता ना. शंभूराज देसाई म्हणाले, खा. उदयनराजे भोसले तसेच आ. मकरंद पाटील यांना महत्त्वाच्या बैठका होत्या. खा. उदयनराजे हे याठिकाणी येऊन गेले. तसेच त्यांचे प्रतिनिधी बैठकीस उपस्थित होते. त्यांच्याशी फोनवरुन चर्चा झाली असल्याचे त्यांनी सांगितले.



महाविकास आघाडीतून माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव समोर येत आहे याकडे लक्ष वेधले असता ना. शंभूराज देसाई म्हणाले, बरीच नावे समोर येतायत..पुन्हा मागे पडतायंत. जोपर्यंत लढतीचे अंतिम चित्र स्पष्ट होत नाही तोपर्यंत भाष्य करणे योग्य नाही. महायुतीच्या कोट्यातून भाजपचे २० उमेदवार जाहीर झाले. शिवसेना (शिंदे गट) ८ तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) ४ ते ५ नावे जाहीर झाली आहेत. दुसरा टप्प्यातील नावे लवकरच जाहीर होतील, असे त्यांनी सांगितले.

अशोक गायकवाड म्हणाले, भाषणातून नाराजी व्यक्त केली आहे. महायुतीचे सरकार सत्तेत आणण्यात आरपीआयचे नेते रामदास आठवले यांचा मोठा वाटा आहे. सत्ता आणली म्हणून आठवले यांना त्यांनी मंत्री केले म्हणजे त्यांच्यावर उपकार केलेले नाहीत. २०१४ साली लोकसभा निवडणूक लढलो. महायुतीत असूनही गेल्या दहा वर्षांत एकही शासकीय समिती आरपीआयच्या पदरात आली नाही. जिल्हा परिषदेचा मंतदारसंघ दिला नाही. कुठल्याही शासकीय समितीवर सदस्य घेतला नाही. तुम्ही युतीत आहात पण सत्तेत नाही. त्यामुळे आमची ही युती कसली आहे? असा प्रश्न पालकमंत्र्यांना विचारला. डीपीडीसीवर सदस्य घ्यावेत यासाठी रामदास आठवले यांनी पालकमंत्र्यांना चारवेळा फोन केला पण संधी मिळाली नाही. झालेली चूक दुरुस्त कधी होणार? आमच्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत तोपर्यंत आम्ही तटस्थ राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), आरपीआय (आठवले गट) रयत क्रांती शेतकरी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### भाजपकडून खा. उदयनराजेच!

**भाजपकडून तुम्हाला उमेदवारीमिळणारअसल्याची चर्चा असून त्यामध्ये कितपत सत्यता आहे, असे विचारले असता सातारा लोकसभा मतदारसंघाचे प्रभारी व प्रमुख डॉ. अतुल भोसले म्हणाले, महायुतीतून उमेदवार निवडून आणण्याचा प्रयत्न भाजपाचा कार्यकर्ता म्हणून करत आहे. भाजपच्यावतीने खा. श्री. छ. उदयनराजे भोसले यांचेच नाव विचाराधीन आहे. त्यांनाच निवडणूक लढवण्याची संधी मिळावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. तिन्ही पक्षाचे नेते निर्णय घेतील. लवकरच त्याबाबत स्पष्टता येईल. सुरेशबाबा आणि मी लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक नाही. पक्षपातळीवर माझ्या नावाची चर्चा झालेली नाही. मोदींच्या विचारांची व्यक्ती निवडून आणणे हीच आमची भूमिका आहे.**

# जलसुरक्षक म्हणतात, पाण्याइतके मतदान महत्त्वाचे!

## कोरेगावात मतदान जनजागृती!




**राजदंड / कोरेगाव**

येथील पंचायत समितीमध्ये पाणी स्वच्छता विभागाच्या अंतर्गत काम करणाऱ्या जलसुरक्षकांनी पंचायत समिती येथे मतदानाची आणि जास्तीत जास्त मतदानाचा प्रचार करण्याची शपथ घेतली! पाणी हेच जीवन आहे. तथापि, लोकशाही सुदृढ होण्यासाठी आणि नागरिकांचे जीवन समृद्ध होण्यासाठी मतदानाचा हक्क बजावणे, मतदानाचा अधिकार बजावणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जलसुरक्षक म्हणून काम करत असताना ग्रामीण भागात मोठा संपर्क येतो. अशावेळी वृद्ध, महिला, दिव्यांग, नवमतदार अशा सर्वांशी बोलण्याचा योग येतो. अशावेळी जास्तीत जास्त मतदानाचे महत्त्व पटवून देऊन मतदानाविषयी जनजागृती करण्याचा निर्धार जलसुरक्षकांनी केला.

यावेळी मतदान जनजागृती पथकाचे प्रमुख यशेंद्र क्षीरसागर तसेच, पाणी व स्वच्छता विभागाचे प्रथमेश वायदंडे, रुपेश किरतकुडवे, स्वाती नांदे इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

देशाची संस्कृती समृद्धी आणि विकास साधायचा असेल तर लोकशाही प्रक्रियेत सर्व नागरिकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. जास्तीत जास्त मतदान होणे म्हणजेच लोकशाहीचा गौरव आहे. हा गौरव सर्वांनी करावा आणि सर्वच पात्र नागरिकांनी मतदानाचा हक्क बजवावावा. यासाठी ग्रामीण भागात आपापल्या गावात मतदान जनजागृती करणार असल्याचा मनोदय जलसुरक्षकांनी ठामपणे व्यक्त केला.

# डॉ. अभिजित नातू यांना 'आर्किटेक्ट एक्सलन्स अ‍ॅवार्ड'

**राजदंड / पुणे**



इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस् कडून दिला जाणारा उत्कृष्ट शोधनिबंधासाठीचा राष्ट्रीय स्तरावरील 'आयआयए अ‍ॅवार्ड फॉर एक्सलन्स इन आर्किटेक्चर' हा पुरस्कार येथील ज्येष्ठ आर्किटेक्ट डॉ. अभिजीत नातू यांना मिळाला आहे. मुंबई येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्टस् तर्फे नुकत्याच आयोजित पुरस्कार सोहळ्यात हा पुरस्कार देण्यात आला.

'जनसामान्य लोकांमधे वास्तुकले विषयीची जाण व दृष्टिकोन' हा संशोधनाचा विषय होता. डॉ. नातू हे पुण्यातील भारतीय कला प्रसारिणी सभेच्या वास्तुविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. प्राथमिक फेरीतील भारतभरातून आलेल्या शोधनिबंधातून ४ निवडण्यात आले. या ४ शोधनिबंधांचे सादरीकरण तज्ज्ञांसमोर झाले. त्यातून एक पुरस्कारासाठी निवडण्यात आला.

# खा. उदयनराजे यांनी साधला रहिमतपूरकरांशी संवाद

**राजदंड / कोरेगाव**

रहिमतपूर येथे छत्रपती उदयन राजे भोसले यांनी रहिमतपूर येथील भारतीय जनता पार्टी तील पदाधिकारी रहिमतपूर नगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते निलेश माने व चित्रलेखा माने कदम यांच्या निवास्थानी भेट दिली ते कराड उत्तर मतदारसंघाच्या दवऱ्यावर आहेत.

यावेळी शेकडो कार्यकर्ते महाराजांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. यावेळी उदयनराजेंनी कार्यकर्त्यांनी तयारीला लागण्याचे आव्हान केले त्याच बरोबर आपल्या हटके शैलीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह भरण्याचे काम यावेळी बोलताना त्यांनी केले.यावेळी निवडणूक समन्वयक, जेष्ठ व युवा कार्यकर्ते तसेच महिला भगिनी यांची संवाद बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा चित्रलेखा माने-कदम,



माजी नगराध्यक्ष संपतराव माने , माजी नगरसेवक विरोध पक्षणेते निलेश माने, माजी नगरसेवक अंकुश भोसले, शंकर भोसले, शेखर माने, धनंजय पवार, प्रवीण माने, जनार्दन चव्हाण, संजय माने, सतीश भोसले, अनिल माने, पोपट माने, राजेंद्र नलवडे, विशाल माने, राजेंद्र माने, बाबा जाधव, नंदकुमार माने, राजेंद्र रोकडे, निलेश माने,योगेश चव्हाण,रणजीत माने, संग्राम माने, आदी उपस्थित होते.

येथे उदयनराजे भोसले यांनी रहिमतपूर येथील भारतीय जनता पार्टीतील पदाधिकारी रहिमतपूर नगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते निलेश माने व चित्रलेखा माने कदम यांच्या निवास्थानी भेट दिली ते कराड उत्तर मतदारसंघाच्या दवऱ्यावर आहेत.

यावेळी शेकडो कार्यकर्ते महाराजांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. यावेळी उदयनराजेंनी कार्यकर्त्यांनी तयारीला लागण्याचे आव्हान केले त्याच बरोबर आपल्या हटके शैलीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह भरण्याचे काम यावेळी बोलताना त्यांनी केले. यावेळी निवडणूक समन्वयक, जेष्ठ व युवा कार्यकर्ते तसेच महिला भगिनी यांची संवाद बैठक मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा चित्रलेखा माने-कदम, माजी नगराध्यक्ष संपतराव माने, माजी नगरसेवक विरोध पक्षणेते निलेश माने, माजी नगरसेवक अंकुश भोसले, शंकर भोसले, शेखर माने, धनंजय पवार, प्रवीण माने, जनार्दन चव्हाण, संजय माने, सतीश भोसले, अनिल माने, पोपट माने, राजेंद्र नलवडे, विशाल माने, राजेंद्र माने, बाबा जाधव, नंदकुमार माने, राजेंद्र रोकडे, निलेश माने, योगेश चव्हाण, रणजीत माने, संग्राम माने, आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## बारामती लोकसभेत नणंद - भावजयची लढत, लढतीकडे देशाचे लक्ष...!

तर याच मतदारसंघातील माजी आमदार रमेश थोरात यांना मानणारा मोठा वर्ग आहे. रमेश थोरात हे अजित पवार यांचे कट्टर समर्थक आहेत. त्यामुळे साहजिकच रमेश थोरात सुनेत्रा पवार यांच्यासाठी सक्रिय राहतील.

पुरंदर विधानसभा मतदार संघात काँग्रेसचे आमदार संजय जगताप यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे आ संजय जगताप आघाडीचा धर्म पळतील व सुप्रिया सुळे यांना मदत करतील. ह्याच विधानसभा मतदार संघातील मंत्री विजय शिवतारे यांची समजूत काढल्यामुळे त्यांचा बंद थंड झाला असून ते सुनेत्रा पवार यांना मदत करतील. याच मतदार संघातील एके काळी अजित पवार यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जाणारे विजय टेकावडे आगोदरच भाजपा मध्ये गेल्याने त्यांचाही फायदा सुनेत्रा पवार यांना होणार हे स्पष्ट आहे.

भोर विधानसभा मतदार संघात काँग्रेसचे आमदार संग्राम थोपटे यांचे वर्चस्व आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी जेष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत आमदार थोपटे यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यामध्ये सुप्रिया सुळे यांना साथ देण्याचे आश्वासन देत भोर तालुक्यातील जनतेला सुप्रिया सुळे यांना मोठ्या प्रमाणात मताधिक्य करण्याचे आवाहन केले असल्याने सुप्रिया सुळे साठी ही जमेची बाजू आहे.

खडवासाला मतदार संघ भाजपाचे आमदार भिमराव तापकीर यांच्या प्राबल्यखाली आहे. या मतदार संघात भाजपा चा मोठा जनाधार आहे. त्याचा सुनेत्रा पवार यांना चांगलाच फायदा होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या मतदारसंघात कोणत्याही परिस्थितीत सुनेत्रा पवार यांना निवडूण आणण्याचे आव्हान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढे आहे. त्या दृष्टीने त्यांनी वैयक्तिक स्वरूपात या लोकसभा मतदार संघात अधिक लक्ष घातले आहे. तर सुप्रिया सुळे यांचे या लोकसभा मतदार संघात प्राबल्य टिकवण्याचे आव्हान राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे आहे. यासाठी स्वतः शरद पवार यांनी लक्ष घातले आहे.

## सोन्याच्या दराचा नवा उच्चांक

उच्चांकी दर आहे. आत्तापर्यंतचे सर्व विक्रम सोन्यानं मोडीत काढले आहेत. वाढत्या सोन्याच्या वाढत्या दरामुळं सर्वसामान्यांच्या खर्चात मोठी वाढ होत आहे. सोन्याच्या या स्थितीमुळं सोनं खरेदी करावं की नको असा प्रश्न लोकांच्या मनात उपस्थित होत आहे.

दरम्यान, सध्या लग्नसराईचा हंगाम सुरु आहे. यामध्ये अनेक लोक मोठ्या प्रमाणात सोन्या चांदीची खरेदी करत असतात. मात्र, अशातच गेल्या काही दिवसापासून सोन्या चांदीच्या दरात वाढ होत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना रों घेणे परवडत नाही. कारण सोन्याची खरेदी करणे आवाक्याबाहेर जात आहे. त्यामुळे लग्नसराईसाठी सोन्याची खरेदी कशी करावी? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## चारित्र्यहनन मुद्द्यावर प्रणिती शिंदेंना राम सातपुतेंनी फटकारले

पंढरपूर तालुका आणि शहरात राम सातपुते यांनी गाठीभेटीचा कार्यक्रम सुरू केला होता. रात्री उशिरा पंढरपुरात फडावर करताना त्यांनी शाहिद मेजर कुणाल गोसावी यांच्या घरी जाऊन त्यांच्या प्रतिमेस वंदन केले. यावेळी झालेल्या बैठकीत प्रणव परिचारक, नीलराज डोंबे, लेखन चौघुले यांचेसह परिचारक गटाचे नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुते यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून आमदार प्रणिती शिंदे आणि आमदार राम सातपुते यांनी एकमेकांवर केलेल्या आरोप प्रत्यारोपानं निवडणूक गाजायला लागली होती. निवडणुकीची लाईन विकासावरून घसरून तिसरीकडेच चालल्याचे पाहून भाजप उमेदवार राम सातपुते यांनी आता आपण फक्त विकासावरच बोलणार असल्याचे सांगून प्रणिती यांनीही फक्त विकासावरच बोलावे, असे सुनावले आहे. फडणवीसांनी सोलापूरला जितके दिले तेवढे काँग्रेसने दिले का? असा सवाल करत त्यांनी सोलापुरातील केलेल्या कामांचा पाढा वाचला. प्रणिती शिंदे यांच्याकडे बोलण्यासारखे काहीच नसल्याने वाटेल तशी वक्तव्य करत असून पुलवामा हल्ल्यावरील आरोप हा तर तमाम शहिदांचा अवमान असल्याचं सातपुते यांनी सांगितले आहे.

## राजू शेट्टींनी 'मातोश्री'वर भेट घेऊनही हातकणंगलेत उमेदवार का दिला?

आमदार सत्यजित पाटील सरुडकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता हातकणंगलेची लढत चौरंगी लढत होणार आहे, तर सांगलीमध्ये सुद्धा महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रहार पाटील हेच राहण्याची शक्यता आहे. त्याठिकाणी काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम यांनी कडाडून विरोध करूनही काँग्रेस उच्चस्तरीय नेत्यांनी आता सबुरीचा सल्ला दिल्याने जवळपास त्यांचा विरोध मावळल्यात जमा आहे. त्यामुळे वंचितनंतर आता राजू शेट्टी यांचा स्वाभिमानी पक्ष महाविकास आघाडीपासून दूर गेले आहेत.

# 'ईशरे'पुणे चॅप्टरच्या नव्या कार्यकारिणीचे पदग्रहण

**राजदंड / पुणे**

इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग इंजिनीअर्स (ईशरे), पुणे चॅप्टरच्या केंद्रीय कार्यकारिणीचा (सीडब्ल्यूसी) शपथग्रहण सोहळा दि.२ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता नोव्होटेल, विमाननगर, पुणे येथे झाला. अध्यक्षपदी आशुतोष जोशी यांची २०२४-२५ या वर्षासाठी निवड करण्यात आली . आशुतोष जोशी यांच्याकडे ईशरे, पुणे शाखेचे मावळते अध्यक्ष नंदकिशोर कोतकर यांनी सूत्रे सोपवली.




नवनिर्वाचित कार्यकारिणीमध्ये या क्षेत्रातील मान्यवर व्यावसायिकांचा समावेश आहे. चेतन ठाकूर (प्रेसिडेंट इलेक्ट), सुभाष खनाडे (खजिनदार), अमित गुलवाडे (सचिव ), नंदकिशोर कोतकर (माजी अध्यक्ष), सुजल शाह, विमल चावडा, रितेश खेरा, विशाल पवार, प्रमोद वाजे, नीलेश गायकवाड, अरुण चिंचोरे, नीरज मग्रानी, कौस्तुभ वाणी, डॉ. शिकलगार नियाज दिलावर, सुबोध मुरकेवार, मानस कुलकर्णी, डॉ. अंशुल गुजराथी, शशांक मिराशी, रशिदा शब्बीर, शशिधर, सिंपल जैन, महेश मोरे, उल्हास वतपाळ, देविका मुथा, हर्षदा राणे, प्रमोद सीजी (जैन), दिलीप झा, तुळशीदास चौधरी यांचा समावेश या कार्यकारिणीमध्ये आहे. विस्तारित सामितीत आर्किटेक्ट महेश बांगड, प्रीती पुजारी, योगेश एकडे यांचा समावेश आहे.

# सर्वसामान्यांनी शासनाच्या वाळू धोरण योजनेचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी

**राजदंड / फलटण**

शासनाच्या धोरणानुसार सातारा जिल्ह्यामध्ये शासनामार्फत वाळू उत्खनन, वाहतूक व विक्री, साठवणूक तसेच विक्री व्यवस्थापन याबाबतचे सर्वंकष धोरण राबविण्यात येत आहे. जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समितीने ऑनलाईन पद्धतीने निविदा प्रक्रिया राबवून वाई तालुक्यातील आसले, एकसर, पाचवड आणि वाई हे चार वाळू डेपो आणि कराड तालुक्यातील सुपने, इंदोली, घारेवाडी आणि खालकरवाडी हे चार वाळू डेपो असे एकूण ८ वाळू डेपोंसाठी मंजुरी दिलेली आहे. शासनाच्या धोरणानुसार सर्वसामान्यांना वाळू मिळत असून आजअखेर ७४० नागरिकांनी महाखनिज प्रणालीवर वाळू मागणीबाबत नोंदणी करून या योजनेचा लाभ घेतलेला आहे. सर्वसामान्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात शासनाच्या या वाळू धोरण योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.

सातारा जिल्ह्यातील वाई व कराड येथील एकूण ८ वाळू डेपोंमध्ये एकूण ४६०४ ब्रास वाळूची नोंदणी झालेली असून त्यापैकी ४१५२ ब्रास वाळूचे वितरण संबंधित नागरिकांना केलेले आहे. वाळू मागणीच्या अनुषंगाने सदर ८ वाळू डेपोंमध्ये ४५१ ब्रास वाळूसाठा उपलब्ध आहे.

# घरफोडी करणारी आंतरजिल्हा टोळी 'एलसीबी'कडून जेरबंद

## ४० लाख ५ हजार ४०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त

**राजदंड / सातारा**

सातारा जिल्ह्यामध्ये तब्बल १४ ठिकाणी तसेच अन्य जिल्ह्यामध्ये घरफोडी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला स्थानिक गुन्हे शाखेने अत्यंत कौशल्याने तपास करून जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून १८ घर फोडीचे गुन्हे व ८ चोरीचे असे २६ गुन्ह्यांचा तपास करून पोलिसांनी ४० लाख ५ हजार रुपये किमतीचे अर्धा किलो पेक्षा जास्त वजनाची दागिने जप्त केले आहेत याची माहिती पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली

रोहन बिरू सोनटक्के राहणार मुरूम उमरगा जिल्हा नगर, महेंद्र रमाबाई राठोड राहणार कुसेगाव दौंड जिल्हा पुणे,संदीप झुंबर भोसले राहणार वाघोली जिल्हा पुणे, व दोन विधी संघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. १३ मार्च रोजी खेड ग्रामपंचायतीच्या हद्दीत या टोळीतील सोनटक्के याने आणखी एकाच्या मदतीने फिर्यादीच्या कपाटातील ९ लाख २९ हजार ५०० रुपये किमतीचे २९ तोळे सहा ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली होती याबाबत सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती .पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदाराच्या माध्यमातून माहिती मिळवली




सदर गुन्हा पोलीस अभिलेखा वरील आरोपी सुनील उर्फ सुशील बबन भोसले राहणार रामनगर कटकेवाडी वाघोली तालुका हवेली जिल्हा पुणे याने केला असल्याची माहिती मिळाली त्याच्याकडून १२ घरफोडीचे २ चोरीचे १४ गुन्हे उघड करून १३ लाख १९ हजार ९०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले यामध्ये वापरण्यात आलेले एक बोर्ड कटर व स्क्रू ड्रायव्हर असा मला हस्तगत करण्यात आला

याशिवाय सोनटक्के राठोड भोसले व दोन विधी संघर्ष ग्रस्त बालकांची टोळी आंतरजिल्हा सक्रिय असल्याचे स्पष्ट झाले पुणे व सातारा येथे घर फोड्या झाल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले या टोळीकडून सहा घरफोडीचे सहा चोरीचे असे बारा गुन्हे निदर्शनास आणून चालू बाजार भाव प्रमाणे २४ लाख ४५ हजार ५०० रुपये किमतीचे ३६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व रोख २ लाख ४० हजार रुपये रक्कम हस्तगत करण्यात आली आहे पर जिल्ह्यातून साताऱ्यात येऊन हेरलेल्या जागी घर फोडी करायची आणि तेथून पोलिसांना गुंगारा देऊन परत जिल्ह्यात गायब व्हायची अशी गुन्हेगारांची पद्धत होती या टोळीचे घरफोडीचे १८, चोरीचे ८ असे एकूण २६ गुन्हे उघड करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश मिळाले आहे. सर्व कारवायांमध्ये ४० लाख ५ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने नोव्हेंबर २०२२ सून आतापर्यंत घरफोडी जबरी चोरी दरोडा अशी १८९ गुन्हे उघड करून ४ किलो ९८२ ग्राम वजनाचे ३ कोटी १० लाख ८६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केल्याचे सांगण्यात आले.

# पुण्यात भव्य प्रदर्शन व खाद्य जत्रेचे दि. ५ ते ७ एप्रिलदरम्यान आयोजन

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

पुणेकर नागरिकांना सुट्टीच्या काळात खरेदी व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी हॉटेल सेन्ट्रल पार्क प्रांगण, आपटे रोड, डेक्कन जिमखाना येथे शुक्रवार, दि. ५ ते रविवार, दि. ७ एप्रिल असे ३ दिवस खरेदी महोत्सव व खाद्य जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये ६० हून अधिक स्टॉल असेल त्यामध्ये साडी, ड्रेस मटेरियल्स, बँग्ज, इमिटेशन ज्वेलरी, पर्स, कॉस्मेटीकस, परफ्यूम्स, आयुर्वेदक औषधे, तेले, कोकण प्रॉडक्टस, विदर्भ मसाले, मुखवास, चटण्या, केक आणि हस्तकला साहित्य यांचे प्रदर्शन व विक्री असेल. खाद्यपदार्थांमध्ये उकडीचे मोदक, कैरीची डाळ व पन्हे, सरबत, सोलकढी, पराठे तसेच विविध महाराष्ट्रीयन पदार्थ यांची मेजवानी पुणेकरांना मिळेल.

रोज सकाळी ११ ते रात्री ९ या काळात प्रदर्शन व विक्री चालू राहील. दि. ९ एप्रिल रोजी असणाऱ्या पाडवा सणानिमित्त याचे अयोजन करण्यात आले आहे. सामाजिक कर्तव्याचा भाग म्हणून यातील ५ स्टॉल अपंग, अंध, आणि वयस्करांना मदत करणाऱ्या संस्था संयोजकांतर्फे देण्यात आले आहे. परगावहून ही महिलांचे गट यात सहभागी झाले असून दर्जेदार उत्पादने तुलनेने कमी दरात येथे उपलब्ध असतील. याचे उद्घाटन दि. ५ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न होणार आहे.

महाराष्ट्र चित्पावन संघाच्या महिला मंच तर्फे याचे केले आयोजन आहे. मेट्रोजेनिक्स एक्स्पो हे सह.संयोजक असणार आहेत. प्रवेशमूल्य नाही, अशी माहिती महाराष्ट्र चित्पावन संघाचे पुणे कोषाध्यक्ष अजित राजमाचीकर यांनी दिली.

## पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात मतदारांच्या मदतीसाठी कक्ष

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात बी विंगमधील चौथ्या मजल्यावर तक्रार निवारण व मतदार मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे.

या कक्षात मतदारांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि तक्रारी स्विकारण्यासाठी कर्मचारी नियुक्त केले असून कक्षाकडे १८००२३३०१०२ आणि १९५० या टोल फ्री क्रमांक किंवा cvigilldccelection2024gmail.com या ई-मेल पत्त्यावर तक्रार करता येईल. प्राप्त झालेल्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाहीसाठी संबंधित सहायक निवडणूक अधिकारी यांना कळविण्यात येते.

कक्षाकडे दूरध्वनीद्वारे नवीन मतदान ओळखपत्र, ओळखपत्रात दुरुस्ती, मतदान यादीत नाव नोंदणी, ऑनलाइन पद्धतीने ओळखपत्र काढताना येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यात येते, असे जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# पुणे लोकसभा निवडणुकीला आता येणार रंगत...

## वसंत मोरे यांच्या उमेदवारीचा मोहोळ आणि धंगेकर यांना धसका



**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

वंचित बहुजन आघाडीतर्फे मनसेचे माजी नेते वसंतराव मोरे यांना उमेदवारी मिळाल्यावर आता पुणे लोकसभा निवडणुकीला आता खरी रंगत येणार आहे. या उमेदवारीचा महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी धसका घेतला आहे.

पुणे लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि माहायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. मोरे यांनी १०० टक्के निवडणूक लढणार असल्याचे जाहीर केले होते. कोणत्याही परिस्थितीत एकतर्फी निवडणूक होणार नासल्याचा दावा मोरे यांनी केला आहे.

यंदाच्या पुणे लोकसभा निवडणुकीत पुणे महापालिकेच्या ३ नगरसेवकांमध्ये लढत होणार आहे. हे तिन्ही नगरसेवक सभागृहात पुणेकरांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले. त्यामुळेच राजकीय पक्षांनी त्यांना उमेदवारी दिली आहे. वसंतराव मोरे यांनी ॲड. प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन आपली दिशा स्पष्ट केली आहे. मराठा समाजाच्या बांधवांशीही त्यांनी भेट घेतली आहे. त्यामुळे मोहोळ, धंगेकर आणि मोरे अशी तिरंगी लढत पुण्यात होणार आहे. मोहोळ आणि धंगेकर यांच्या उमेदवारीला स्व पाक्षातूनच विरोध होत आहे. मात्र, हा विरोध लवकरच थांबणार असल्याची कुजबुज सुरू आहे.

शरद पवार यांनी धंगेकर यांच्याशी झालेल्या चर्चेत माजी गटनेते आबा बागुल लवकरच तुमच्या प्रचाराला लागणार असल्याचे सांगितले. तर, दुसरीकडे राज्यसभेचे खासदार संजयनाना काकडे यांचीही नाराजी लवकरच दूर करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर ही निवडणूक होत आहे.

# महाबळेश्वर बाजारपेठेतील विकास काम आता अंतिम टप्प्यात

**राजदंड / महाबळेश्वर**

जानेवारीपासून सुरू असलेले बाजारपेठेतील विकास काम आता अंतिम टप्प्यात आले असून हंगामापुर्वी सर्वच अर्धवट राहीलेली कामे पुर्ण करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या आहेत त्या नुसार ही सर्व विकास कामे येत्या दोन आठवडयात पुर्ण करण्याच्य सुचना संबंधित ठेकेदारास दिल्या असल्याची माहीती पालिकेचे प्रशासक योगेश पाटील यांनी दिली.



महाबळेश्वर येथील पर्यटकांची आवक साठ टक्के वाढेल अशा प्रकारच्या सुशोभिकरणाचा आराखडा राज्य शासनाने तयार केला होता तो आराखडा बाजुला ठेवुन भलत्याच आराखडया नुसार बाजार पेठेत काम सुरू आहे बाजारपेठेतील काम जरी जानेवारीत सुरू झाले असले तरी त्या पुर्वीच मस्जीद रोड व स्कुल मोहल्ला या भागातील रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली होती अनेक वेळा सांगुन देखिल ही कामे पुर्ण करण्याकडे ठेकेदाराने कायम दुर्लक्ष केले ही कामे अर्धवट सोडुन ठेकेदाराने जानेवारीत बाजारपेठेतील सुभाषचंद्र बोस चौक ते पोलिस ठाणे या दरम्यानच्या रस्त्याच्या एका बाजुचे १५ टक्के काम सुरू केले बाजारपेठेसह सर्वच भागातील अर्धवट कामे हंगामा पुर्वी पुर्ण व्हावी यासाठी सातारा पालिकेचे प्रशासक अभिजीत बापट यांची नियुक्ती करण्यात आली आहे अभिजीत बापट यांनी सोमवारी पालिकेत आर्किटेक्ट पंकज जोशी ठेकेदार राम सवानी व पालिकेचे मुख्याधिकारी योगेश पाटील यांची एक बैठक घेतली या बैठकीत हंगामा पुर्वी काम पुर्ण करण्याच्या सक्त सुचना अभिजीत बापट यांनी केल्या या वेळी पालिकेचे अभियंता धायगुडे हे देखिल उपस्थित होते

बाजारपेठेतील रस्त्याच्या अर्ध्या भागात पीसीसी वर्क करण्यात आले आहे चार दिवसात या पीसीसीवर बेसॉल्ट जातीचा काळा दगड बसविण्याच्या कामाला सुरूवात केली जाणार आहे या रस्त्याच्या कामा सह शहरातील या ठेकेदाराकडे असलेली सर्व विकास कामे दोन आठवडयात पुर्ण करण्यात येतील असा विश्वास पालिका प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी व्यक्त केला आहे उर्वरीत सर्व कामे सप्टेंबरमध्ये सुरू करण्यात येणार असल्याची माहीतीही पाटील यांनी दिली.

# रहिमतपुरात गटारातून पाण्याची पाईपलाईन टाकल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**राजदंड / कोरेगाव**

येथील जोतिबा माळ परिसरात गटरचे काम अपूर्ण असून खोदकाम केलेल्या गटरच्या सांडपाण्यात रोड ठेकेदार मार्फत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन घालण्यात आली असून त्यातूनच पिण्याचा पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिक संताप व्यक्त करत आहेत.



रहिमतपुरमध्ये कराड रोडचे काम संत गतीने सुरू असून गेले कित्येक महिने हे काम प्रगतीपथावर आहे. या रोड कॉन्ट्रॅक्टरच्या कामाच्या दर्जाबद्दल नागरिकांमध्ये नाराजी असून त्याच्यावर कोणाचाच वचक नसल्याचे दिसत आहे. रोड कॉन्ट्रॅक्टरचा मनमानी पद्धतीने काम सुरू असून त्याच्या बेजबाबदार वागणुकीमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सांडपाण्याच्या गटरमध्ये मोकळ्या टाकलेल्या पाईप मधून परिसरातील नागरिकांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा होत आहे. जर एखादे कनेक्शन लिकेज झाले तर त्यातून पिण्याच्या पाण्यामध्ये गटरचे सांडपाणी जाण्यास वेळ लागणार नाही. नागरिकांचे आरोग्य लक्षात संबंधित अधिकाऱ्यांनी यामध्ये लक्ष्य घालून पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करून दयावी, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.

# शिवम कॉलनीतील विद्युत पोल कोसळण्याचा धोका

- नगरपालिका प्रशासनाला दिले निवेदन...
- नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे!

**राजदंड / सातारा**

शिवम कॉलनी गडकर आळी येथील चौकातील मुख्य विद्युत पोल तळातून पूर्णपणे गंजला असून तो निकामी झाला आहे. त्यामुळे हा विद्युत पोल नागरी वस्तीवर कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

नागरी वस्तीमध्ये असलेल्या विद्युत पोलवरून कॉलनीमधील इतर विद्युत पोलवर विद्युत तारा गेल्याने हा विद्युत पोल कोसळला तर कॉलनीमध्ये मनुष्य आणि होण्याचा धोका आहे. नागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने नगरपालिका प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत अशी मागणी शिवम कॉलनीतील नागरिकांनी नगरपालिका प्रशासनाला दिली आहे.

याबाबतचे लेखी निवेदन राजकुमार गणेश नरूले यांनी सातारा नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिले आहे. प्रशासनाने अद्याप दखल न घेतल्याने येथील नागरिक चिंताग्रस्त आहेत या ठिकाणी हा विद्युत पोल बदलून नवीन विद्युत पोल उभारण्यात यावा अशी मागणी शिवम कॉलनीतील नागरिकांकडून होत आहे.



शिवम कॉलनीतील धोकादायक झालेला पूल.

**धोकादायक ठरू पाहत असलेला विद्युत पोल त्वरित बदलण्यात यावा. अवकाळी पाऊस व वादळ यामुळे हा पोल पूर्णपणे हलत असून विद्युत पोलचा खालचा भाग अर्धवट तुटलेला आहे त्यामुळे तो केव्हाही कोसळू शकतो म्हणून मनुष्य हानी टाळण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.**

**- श्रीरंग काटेकर, शिवम कॉलनी, सातारा**

# परिचारिकांची जागा कृत्रिम बुद्धिमत्ता घेऊ शकत नाही

## जहांगीर रुग्णालयाच्या मुख्य नर्सिंग सुपरिटेंडंट नीता अहिरराव यांचे मत

**राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे**

नर्सिंग व्यवसायात परिचारिका घेत असलेल्या रूग्णांच्या वैयक्तिक काळजीची जागा कृत्रिम बुद्धिमत्ता घेऊ शकत नाही, असे मत जहांगीर रुग्णालयाच्या मुख्य नर्सिंग सुपरिटेंडंट नीता अहिरराव यांनी व्यक्त केले.

डीईएस सुभद्रा के. जिंदाल कॉलेज ऑफ नर्सिंगचा सोळावा लॅम्प लायटिंग समारंभ महापालिकेच्या वैद्यकीय उपाधिकारी डॉ. कल्पना बलिवंत यांच्या हस्ते संपन्न झाला. जहांगीर रुग्णालयाच्या मुख्य नर्सिंग सुपरिटेंडंट नीता अहिरराव यांची प्रमुख उपस्थिती होती. डीईएसचे अध्यक्ष प्रमोद रावत अध्यक्षस्थानी होते. कार्यवाह प्रा. धनंजय कुलकर्णी, प्राचार्या शारदा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

सोनाली गोरे, शीतल ठाकूर, महिमा मेश्रामकर, स्नेहल बदक, आसिफ शेख, प्रथमेश आंबुरे या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा या वेळी गौरव करण्यात आला.

रुग्ण आणि नर्स यांच्यामध्ये निर्माण झालेल्या भावनिक नात्यामुळे आजारपणातून लवकर बरे होण्यास मदत होते, असे मत डॉ. बलिवंत यांनी व्यक्त केले.

नर्सिंग व्यवसायाची तुलना अन्य कोणत्याही व्यवसायाशी होऊ शकत नाही. या व्यवसायात अर्थाजन होतेच, सेवाभावामुळे आत्मीक समाधान मिळते असे रावत यांनी सांगितले.



**गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव मुख्य नर्सिंग सुपरिटेंडंट नीता अहिरराव, वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्पना बलिवंत.**

## नुकसान केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** ७ हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी दोघांवर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, आग लावून छप्पर व धान्याचे असे ७ हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी दोघांवर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

शांताराम रघुनाथ आवळे व नकुसा शांताराम आवळे यांच्या विरुध्द निर्मला उत्तम कवळे (तिघे रा.मालगाव ता.सातारा) यांनी तक्रार दिली आहे.

ही घटना दि. ३० मार्च रोची घडली आहे.

# बदली झालेला लेखापाल परतल्याने पालिका प्रशासनाची अडचण

## अद्याप कारभार दिला नसल्याची माहिती

**राजदंड / सातारा**

सातारा पालिकेच्या बदली होऊन गेलेल्या लेखापाल शबनम शेख या अन्यायकारक बदलीमुळे मॅटमध्ये गेल्या होत्या .शबनम शेख यांनी पुन्हा सातारा पालिकेत येऊन लेखापालाच्या खुर्चीमध्ये ठिया दिला आहे. मात्र अद्याप त्यांच्याकडे कोणताही कार्यभार देण्यात आला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सौर ऊर्जा प्रकल्पाच्या बिलासंदर्भातील फाईल अनाधिकाराने आपल्या ताब्यात ठेवल्याप्रकरणी मुख्याधिकारी अभिजीत बापट व लेखापाल शबनम शेख यांच्यामध्ये शीतयुद्ध पेटले होते. या प्रकरणाचा पालिकेत मोठा गहजब झाला होता. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांनी शबनम शेख यांना ११ महिन्यातच एकतर्फी कार्यमुक्त केले होते. मात्र शबनम शेख यांची आस्थापना वित्त विभाग



सहाय्यक संचालक वर्ग एक अशी आहे, वित्त विभागाकडून त्यांच्या बदल्या केल्या जातात. मात्र मुख्याधिकाऱ्यांनी त्यांना कार्यमुक्त करण्याचा अहवाल ठेवत पालिकेचा लेखा विभागाचा कार्यभार महेश सावंत यांच्याकडे दिला. सावंत हे सध्या ऑडिटर आणि लेखापाल अशी दुहेरी जबाबदारी पार पाडत आहेत.

मात्र गेल्या चार दिवसापासून शब्दम शेख या पुन्हा सातारा पालिकेत हजर झाले असून त्या लेखा विभागाच्या खुर्चीवर येऊन बसतात या अन्यायकारक बदलीच्या विरोधात शेख यांनी मॅटमध्ये धाव घेऊन या संदर्भात याचिका दाखल केली होती. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्यामुळे झालेली बदली मान्य करण्यास एक यांनी नकार देत पुन्हा सातारा पालिकेत हजेरी नोंदवली आहे.

या प्रकारामुळे सातारा पालिका प्रशासनाची अडचण झाली आहे. मात्र, शेख यांच्याकडे कोणताही अद्याप कार्यभार देण्यात आले नसल्याचे लेखा विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

# जमिनीचा सुपीकता वाढण्यासाठी हिरवळीची खते ठरतायंत उपयुक्त

- सुपीकता टिकवून उत्पादन वाढते
- हिरवळीच्या खतांकडे अनेक शेतकऱ्यांचा कल वाढतोय

**राजदंड / कोल्हापूर**

जमिनीचा पोत टिकवण्यासह पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी हिरवळीची खते उपयुक्त ठरू लागल्याने कराड तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी हिरवळीच्या खतांचा मार्ग पत्करला आहे. दिवसेंदिवस रासायनिक खतांच्या किमती वाढत आहेत. मुख्यता रासायनिक खतांच्या अवाजवी व अयोग्य वापरामुळे जमिनीची सुपीकता व उत्पादनक्षमता बिघडली आहे. अशा स्थितीत जमिनीची सेंद्रिय खताची गरज भागवण्यासाठी हिरवळीची खते उपयुक्त ठरत आहेत.



शेतीच्या मशागतीसाठी बैलाच्या जागा यंत्राने, ट्रॅक्टरने घेतली. दुग्ध व्यवसाय अडचणीत आल्याने जनावरांची संख्या कमी होऊ लागली आहे. त्यामुळे जमिनीला शेणखत मिळणे दुरापास्त झाले आहे. रासायनिक खतांचा भरमसाट वापर अलीकडे वाढल्याने जमिनीची सुपीकता कमी झाली. सुपीकता टिकवण्यासाठी जाणकार शेतकरी हिरवळीच्या खताकडे वळला. कराड तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी यंदा ताग, ढेंचा अन्य हिरवळीची पिके घेतली असल्याचे दिसते.

सद्य:स्थितीत हिरवळीची पिके उपयुक्त ठरू लागल्याने अनेक शेतकऱ्यांनी ताग व डेंच्या या हिरवळीच्या पिकांना प्राधान्य दिले आहे. ताग हिरवळीचे उत्तम पीक असून सर्व प्रकारच्या जमिनीत वाढते. पेरणीनंतर पाच-सहा आठवड्यांनी फुलोऱ्यात येते. त्यावेळी नांगराच्या साह्याने हे पीक जमिनीत गाडले जाते. ही प्रक्रिया रिकाम्या शेतात साधारणपणे मार्च ते मे दरम्यान पूर्ण केली जाते. त्यामुळे जून महिन्यात पेरणी करताना किंवा उसाची लागण करताना इतर खतांची गरज कमी प्रमाणात भासते. तर जमिनीत गाडलेले हे हिरवळीचे खत पिकासाठी उपयुक्त ठरत आहे. अशी माहिती हेळगावचे शिवाजी सूर्यवंशी यांनी दिली.

### हिरवळीच्या खताचे फायदे.....

- **प्रती हेक्टर सुमारे ५० ते १७५ किलो नत्र उपलब्ध करते.**
- **जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवते.**
- **मातीची पाणी व अन्नद्रव्य धरून ठेवण्याची क्षमता वाढवते.**
- **मातीचा भौतिक रासायनिक व जैविक पोत सुधारण्यास मदत होते.**
- **मातीत सेंद्रिय कर्ब वाढल्याने उपयुक्त सूक्ष्म जिवांच्या निर्मितीचे प्रमाण वाढते.**
- **सर्वसाधारणपणे शेंग वर्गीय पिकातून बनलेले एक टन हिरवळीचे खत सुमारे तीन टन शेणखताच्या बरोबरीने असते.**
- **जमिनीची धूप कमी होण्यास मदत होते.**

# सर्व्हेच्या माध्यमातून अंगणवाडी सेविकांकडून मतदान जागृतीचे कार्य



**राजदंड / कोरेगाव**

एप्रिलमध्ये करावयाच्या घरोघरच्या सर्व्हेच्या माध्यमातून अंगणवाडी सेविका मतदान जनजागृतीचे देखील काम करणार आहेत. तसा निर्धार कोरेगाव तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी व्यक्त केला.

जळगाव आणि चिमणगाव येथील अंगणवाडी सेविकांच्या मेळाव्यात मतदान जनजागृती पथकाचे नोडल अधिकारी सुजितकुमार इंगवले यांनी मार्गदर्शन केले. त्यावेळी अंगणवाडी पर्यवेक्षिका आणि सेविकांनी निर्धार केला.

# दाटे अंधाराचे जाळे

एप्रिलचा भीषण उकाडा अंग पोळून काढू लागताच महावितरणने वीजबिलात सरासरी साडेसात टक्क्यांची वाढ केली. स्थिर आकारात १० टक्के वाढ केली. `'फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश' या सर्वतोमुखी असलेल्या गीताची पहिली ओळ वाजवत गावागावात फिरणारी रिक्षा ग्राहकांना आपले थकितवीजबिलभरण्याचे आवाहन करताना, न भरल्या सवी जकापण्याचा इशारा देते.



आपल्या देशात वीज-पाण्यापासून धान्य-टीव्हीपर्यंत अनेक वस्तू वर्षानुवर्षे मोफत वाटण्याचा लोकानुनयी लोचटपणा राजकीय पक्षांनी केला असल्याने 'सर्वच वस्तू मोफत मिळणे हा माझा जन्मसिद्ध हक्क असून त्या मी मोफतच मिळवणार', अशी प्रतिज्ञा अनेक समाजघटकांनी तोंडपाठ केली आहे. धो धो पाऊस पडू लागल्यावर सफाई कामगार संप करून जसे आपल्या मागण्या पदरात पाडून घेतात, त्याच धर्तीवर एप्रिलचा भीषण उकाडा अंग पोळून काढू लागताच महावितरणने वीजबिलात सरासरी साडेसात टक्क्यांची वाढ केली. स्थिर आकारात १० टक्के वाढ केली.-ऊत्रएठढखडएचएछढसमाजात एक उच्च मध्यमवर्ग तयार झाला आहे. ज्याला सध्या चार हजार रुपये घरगुती वीजबिल येत असेल तर त्याला पाच हजार रुपये आल्याने फारसा फरक पडत नाही. मात्र ग्रामीण भागात रात्री शेतामध्ये पंपाद्वारे पाणी सोडणाऱ्या एखाद्या शेतकऱ्याची बिल भरण्याची परिस्थिती नसताना त्याला मोठ्या रकमेचे बिल आले तर कदाचित तो गळफास घेऊन मोकळा होतो. इतका विरोधाभास या दरवाढीच्या परिणामात दिसू शकतो. महावितरणकडील वीजबिलाची थकबाकी ७४ हजार कोटींच्या घरात आहे. त्यामध्ये सर्वात मोठी ४० हजार कोटी रुपयांची थकबाकी कृषी बिलांची आहे. महापालिका, नगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालये वगैरे यांनी तीन हजार कोटी थकवले आहेत. काही थकबाकीदारांची प्रकरणे कोर्टात प्रलंबित आहेत, तर काही थकबाकीदार हयात नसून बिलांचे वाद कोर्टकज्जात अडकले आहेत. अशी थकबाकी चार हजार कोटी आहे. निवासी व औद्योगिक थकबाकीदारांकडून तीन हजार कोटी रुपये येणे बाकी आहे. मागे नागपूरला मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याची थकबाकी असल्याने वीज कनेक्शन कापले गेल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदली झाली होती.शेतकरी वर्ग ही मतपेढी आहे. त्यामुळे त्यांच्यावर व्यापक कारवाई करणे म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या हितसंबंधांच्या गळ्याला नख लावणे.

बिल न भरल्याने मंत्री, जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त यांच्या कार्यालयाची वीज कापली गेलीय व ते घामाघूम होऊनही काम करताहेत हे दृश्य चित्रपटात ठीक आहे. कोर्टकज्जे आपल्या गतीने जात असल्याने त्यातील पैसे लागलीच मिळणेही शक्य नाही. राहता राहिला औद्योगिक व निवासी ग्राहक.. पण तेथेही दबाव, लाचलुचपत, मारझोड यामुळे वसुली हे बहुतांश दिवास्वप्न आहे. अशा परिस्थितीत महावितरणला राज्य वीज नियामक आयोगापुढे आपल्या वीजदरवाढीच्या मागणीचे तर्कशुद्ध समर्थन करावे लागते. ग्राहकांपासून सर्व संबंधितांची बाजू ऐकल्यावर आयोगाला जेवढी योग्य वाटेल तेवढी दरवाढ मंजूर होते.महाराष्ट्राचीविजेची गरज ही २६ ते २७ हजार मेगावॅट असून कोळशापासून वीजनिर्मिती करणाऱ्या सरकारी व खासगी वीज निर्मिती कंपन्यांनी दोन लाख कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक केलेली आहे. त्यामुळे विजेची मागणी कमी असतानाही एक निश्चित रक्कम महावितरणला मोजावी लागते.

कृषी क्षेत्राला वीजपुरवठा करणाऱ्या फिडरला सौरऊर्जेशी जोडण्याबाबत फेब्रुवारीत करार झाले असून, नऊ हजार मेगावॅट सौर ऊर्जा कृषी क्षेत्राला प्राप्त झाली तर कोळशापासून निर्माण होणाऱ्या विजेची मागणी व आर्थिक बोजा कमी होईल. राज्यातील अनेक बड्या उद्योगांनी सौरऊर्जेचा वापर सुरू केल्याने उद्योगांना महागडी वीज पुरवून सामान्यांना स्वस्तात वीज देण्याची क्रॉस सबसिडीची पद्धती जवळपास मोडीत निघाली आहे.

परिणामी सामान्यांची थकबाकी वाढली. छत्तीसगड, बिहार वगैरे भागातून रेल्वेमार्फत येणाऱ्या कोळशाचा खर्च परवडत नाही. तो कमी झाला तरी विजेचे दर नियंत्रित राहू शकतात. परंतु जेव्हा विजेची मागणी वाढते व देशी कोळसा उपलब्ध होत नाही तेव्हा दुप्पट दराने विदेशी कोळसा वीजनिर्मितीकरिता वापरावा लागतो.महाराष्ट्रातएप्रिल ते जून व ऑक्टोबर महिना असे चार महिने विजेची मागणी वाढते. तापमान दोन अंश सेंटिग्रेडने वाढले तरी विजेची मागणी १५० मेगावॅटने वाढते. उन्हाळ्यात दिवसभरात पाच तास मागणी बरीच अधिक असते. त्यामुळे वर्षभराकरिता अतिरिक्त वीज खरेदीची जबाबदारी घेण्यापेक्षा गॅसपासून होणाऱ्या वीजपुरवठ्याचा पर्याय कोळशाच्या तुलनेत गॅसवरील वीज महाग असली तरीही दूरगामी विचार करता किफायतशीर ठरू शकतो. महावितरणकरिता आजही 'फिटे नव्हे' तर दाटे अंधाराचे जाळे हेच वास्तव आहे व दीर्घकाळ राहणार आहे.

# मार्च एण्ड झाला... अहमदनगर जिल्हा परिषदेचा ८२ टक्के निधी



**अहमदनगर :** गेल्या महिनाभरापासूनजिल्हा परिषदेतनिधी खर्च करण्याचे नियोजन सुरू होते. त्यात बऱ्यापैकी यश आल्यानेजिल्हा परिषदेचामार्चअखेर ८२ टक्के निधी खर्च झाला आहे. आता उर्वरित १८ टक्के म्हणजे सुमारे ६० कोटींचा निधी खर्च करण्यासाठी मुदतवाढ मिळवावी लागणार आहे. दरम्यान, कृषी, समाजकल्याण विभागाचा १०० टक्के निधी खर्च झाला आहे.-ऊत्रएठढखडएचएछढजिल्हा नियोजन समितीच्या वतीने दरवर्षी जिल्हा परिषदेला निधी मंजूर केला जातो. निधी खर्च करण्याची मुदत दोन वर्षांची असते. परंतु तरीही दरवर्षी हा निधी अखर्चित राहतोच. सन २०२२-२३ मध्ये जिल्हा परिषदेला जिल्हा नियोजन समितीकडून ३२७ कोटी ८७ लाखांचा निधी मिळाला होता. त्यातून मार्चअखेर २६८ कोटी एवढाच निधी खर्च झाला. परिणामी अजूनही ५९ कोटी ८४ लाखांचा निधी अखर्चितच आहे. जिल्हा परिषदेवर पदाधिकारी आणि सदस्य मंडळ अस्तित्वात असताना निधी अखर्चित राहण्याचे प्रमाण याहीपेक्षा जास्त होते.

दरम्यान, २०२२ पासून जिल्हा परिषदेवर प्रशासक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी काम पाहत आहेत. त्यामुळे काही प्रमाणात निधी खर्चाचे प्रमाण वाढले आहे. मागील वर्षी मार्चअखेर ८० टक्के खर्च झाला होता. यावर्षी त्यात २ टक्के वाढ होऊन ते प्रमाण ८२ टक्क्यांवर पोहोचले आहे.सर्वाधिक निधी समाजकल्याणलाखर्चाच्या बाबतीत कृषी व समाजकल्याण विभागाने बाजी मारली आहे. कृषी विभागाने ६ पैकी ६ कोटी खर्च केले आहेत. तर समाजकल्याण विभागाने ८१ कोटी ९७ लाख म्हणजे १०० टक्के निधी खर्च केला आहे. सर्वाधिक निधी समाजकल्याण विभागालाच मिळालेला आहे.

निधी खर्च करण्यात शिक्षण, बांधकाम मागेनिधी खर्च करण्यात शिक्षण विभाग, तसेच बांधकाम विभाग मागे आहे. सर्वात कमी म्हणजे ५५.५० टक्के निधी बांधकाम (दक्षिण) विभागाचा आहे. त्यानंतर ५८ टक्के शिक्षण विभाग, तर ६७ टक्के निधी बांधकाम (उत्तर) विभागाने खर्च केलेला आहे.

दोन वर्षांपासूनचे प्रस्ताव रखडले, आंतरजातीय अनुदान मिळेना

समाजकल्याण विभाग : ३२० प्रस्तावांसाठी हवा आहे १ कोटी ६० लाखांचा निधी

# दोन वर्षांपासूनचे प्रस्ताव रखडले

## आंतरजातीय विवाहाचे अनुदान मिळेना



**आंतरजातीय विवाह अनुदान प्राप्त होताच लाभार्थ्यांच्या थेट खात्यात वर्ग होईल. नगर जिल्ह्यातून फेब्रुवारी २०२२ पासून ३२० प्रस्ताव अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यासाठी १ कोटी ६० लाखांची मागणी शासनाकडे केलेली आहे.**

**- देवीदास कोकाटे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद**

**अहमदनगर :** जाती-जातीतील भेद मिटवून आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून जोडप्यांना ५० हजारांचे अनुदान देण्यात येते. मात्र नगर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून ३२० लाभार्थ्यांना या प्रोत्साहनपर अनुदानाची प्रतीक्षा आहे. त्यासाठी १ कोटी ६० लाखांची मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे.-ऊत्रएठढखडएचएछढआंतरजातीय विवाहाला समाजातून मोठ्या प्रमाणात विरोध होतो. समाजात एकजूट वाढण्यासाठी आंतरजातीय विवाह झाले पाहिजे, यासाठी जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या वतीने आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजना राबवली जाते. योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती सर्वसाधारण या प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. त्यासाठी आंतरजातीयलग्नकेलेल्या जोडप्याने जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत जोडप्याचे जातीचे दाखले, विवाह नोंदणी दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, दोघांचे रहिवास दाखले, विवाहाचे प्रतिज्ञापत्र, आधार कार्ड, संयुक्त बँक खाते क्रमांक, विवाहाचे छायाचित्र, दोन प्रतिष्ठितांची शिफारसपत्र अशी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.नगर जिल्ह्यात फेब्रुवारी २०२२ पासूनचे ३२० प्रस्ताव अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. जून २०२३ मध्ये काही अनुदान आले होते. मात्र त्यातून २०२२ पूर्वीचे प्रस्ताव निकाली निघाले. मार्चअखेरपर्यंत या योजनेसाठी अनुदान येईल, अशी शक्यता होती. मात्र अद्याप अनुदान आलेले नाही.

आंतरजातीय लग्न करणाऱ्या जोडप्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. अनुदानाची रक्कम पती-पत्नी यांच्या संयुक्त नावाच्या बँक खात्यात टाकली जाते.

मागील वर्षी १ कोटीचे अनुदान प्राप्त झाले होते. त्यातून २०० प्रस्ताव मार्गी लागले. आता शासनाकडून पूर्ण १ कोटी ६० लाखांचा निधी मिळून सर्व प्रस्ताव मार्गी लागतील की काहींना अजून प्रतीक्षा करावी लागणार, याकडे लाभार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

# कागलच्या जवाहर नवोदय विद्यालयात निवड चाचणी

**कागल :** कागलच्या जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी २०२४ चा निकाल जाहीर झाला आहे. इयत्ता सहावीच्या प्रवेशासाठी २० जानेवारी २०२४ रोजी प्रवेश चाचणी परीक्षा घेण्यात आली होती. त्यातून८० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी ४ एप्रिल २०२४ रोजी जवाहर नवोदय विद्यालय कागल येथे सकाळी १०:३० वाजता उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्यडी रवी दामोदरन यांनी केले आहे.

निवड झालेले विद्यार्थी असे शर्विल संताजी खोपडे, पियुष संभाजी पाटील विशिवम सुदाम घोडके ,आराध्या प्रमोद कदम तनिशकुमार बाबसाहेब ढोले, अमृता सावबा पाटील, संध्या शिवाजी पाटील, आराध्य चंद्रकांत पाटील,वेदिका अनिल येवरे, वरद किरण बन्ने, शंभुराजे अमित सावाघवे ,विराज अतुल भारती ,सिध्देश शैलेश आंबेकर,समर्थ रमेश कांबळे, तनिष्क विलास चव्हाण, दिशा विजय कांबळे, अमोघ साताप्पा चौगले, समिक्षा नागेंद्र डेळेकर, ओम सुनिल देसाई, हर्षिका मनोहर भारमल ,मंदार दत्तात्रय पाटील, मैथिली रविंद्र थोरावत, माधवी सात्तापा हजारे, जयवर्धन सागर जाधव, अरविंद सागर देसाई ,सोनसिंह विकम पाटील, सई अमरसिंह देसाई ,प्रसाद प्रदीप वाघ अजिंक्य अरुण पाटील, सई सागर मोळे, प्रतिक रंगराव पाटील, आराध्या चंद्रकांत पाटील, स्वती विनोद शिंदे, ' अर्जन प्रशांत पोतदार, राजनिल अमृत चव्हाण ,सेजल मारुती खोत, जान्हवी गणपती पाटील, विरेन संदीप खतकर,संस्कार कृष्णात मालवेकर,कौस्तुभ मनोहर सुतार, संस्कार सुभाष नाईक, वेदांत सुनिल महाडीक, स्वरा बलराम नाईक, पृथ्वीराज प्रताप पाटील, राजनंदिनी सचिन भोसले, आराध्या अभिजित चौगले, कार्तिक संदीप पाटील ,सृष्टी सुनिल चौगले, प्रज्वल अंबादास जाधव, पृथ्वीराज प्रकाश चव्हाण, अथर्व संदीप पाटील, सोनाली पांडुरंग पाटील, अथर्व दिपक ढोणे ,ईश्वरी बाबासाहेब माळी, श्रीकांत सुभाष दुधाळे, संस्कार उमाजी कुंभार, वरद धनाजी पाटील, कौमुदी जयवंत मतीवडेकर, गायत्री सागर पाटील,चित्रा उमेश पाटील, सिध्दी संतोष पाटील,अथर्व दशरथ पाटील, संस्कार संदेश म्हसकर,चैतन्य जायशंकर जावडे, मृणाल राजु पवार,शिफा फारुक शेख, तनिष्का सुरशे माने, आराध्या शिवाजी कांबळे, अथर्व गजानन चौगले, आविष्कार जाधव, आराध्या अमोल कांबळे, सार्थक सागर कटके, आराध्या गुरुदेव घाडके, सुबोधी विशाल कांबळे, निसर्ग नंदकुमार कांबळे,आराध्या पांडुरंग गोडे,र ाजनंदिनी तानाजी दिवटे, विदयाश्री सिंदुर पावर, तितिकक्षा गंजानन बायनवाड, दर्शन महेश नाईक आदींचा समावेश आहे.

# आचारसंहितेत 'जलयुक्त शिवार'च्या ४७९ कामांना ब्रेक!

## जिल्ह्यात १,१९५ कामांना प्रशासकीय मान्यता



**अकोला :** जलयुक्त शिवारअभियान अंतर्गत जिल्ह्यात मंजूर करण्यात आलेल्या कामांपैकी १ हजार १९५ कामांना दोन महिन्यांपूर्वी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ९० कामे पूर्ण करण्यात आली असून, १८१ कामे सुरू असली तरी, लोकसभा निवडणुकीसाठी लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेत प्रशासकीय मान्यता आणि 'वर्क ऑर्डर ' बाकी असलेल्या 'जलयुक्त शिवार'च्या४७९ कामांना 'ब्रेक' लागला आहे.-जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत २०२३-२४ या वर्षासाठी जिल्हास्तरीय समितीमार्फत जिल्ह्यातील १३१ गावांची निवड करण्यात आली असून, संबंधित गावांच्या शिवारात जलयुक्त शिवारची कामे करण्यासाठी १३१ कोटी ७० लाख रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला. त्यामध्ये जलयुक्त शिवारची विविध १ हजार ६७४ कामे मंजूर करण्यात आली. त्यापैकी १ हजार १९५ कामांना दोन महिन्यांपूर्वी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असली तरी त्यापैकी ९० कामे पूर्ण करण्यात आली असून, १८१ कामे सुरू आहेत. दरम्यान, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय मान्यता आणि कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर ) बाकी असलेली जिल्ह्यातील 'जलयुक्त शिवार'ची ४७९ कामे थांबल्याचे चित्र आहे.जलयुक्त शिवार अभियानमध्ये जिल्ह्यात मंजूर १ हजार ६७४ कामांपैकी ४७९ कामांना प्रशासकीय मान्यता आणि कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) देण्याची प्रक्रिया अद्याप बाकी आहे. लोकसभा निवडणुकीसाठी लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेच्या कालावधीत या कामांच्या प्रशासकीय मान्यतासह 'वर्क ऑर्डर' देता येणार नसल्याने, आचारसंहितेत या कामांना 'ब्रेक' लागल्याचे चित्र आहे.

### अशी आहेत कामे!

**जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत जिल्ह्यातील १३१ गावांत १ हजार ६७४ जलयुक्त शिवारची विविध कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यामध्ये ढाळीचे बांध, शेततळे, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट नाला बंधारे, द्वारयुक्त बंधारे, बांधावरील वृक्षलागवड व कोल्हापुरी बंधाऱ्यांची दुरुस्ती आदी कामांचा समावेश आहे.**

### मान्यता असूनही ९२४ कामे रेंगाळली!

**लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत जिल्ह्यात १ हजार १९५ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ९० कामे पूर्ण करण्यात आली असून, १८१ कामे सुरू असली तरी, मान्यता असूनही उर्वरित ९२४ कामे रेंगाळल्याचे चित्र आहे**

# 'मार्च एंड'मुळे रखडली ७ लाख जणांची पेन्शन, ५ तारखेपर्यंत जमा होण्याची शक्यता




**नाशिक :** राज्यातील शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या खात्यात यंदा दोन तारीख उलटूनही सेवानिवृत्ती वेतन जमा न झाल्याने जिल्हा कोषागार कार्यालयात त्यांचे दूरध्वनी खणखणू लागले आहेत. मात्र, मार्च एंडच्या धावपळीमुळे हा निधी जमा होण्यास विलंब झाल्याने गुरुवारपर्यंत (दि. ४) पेन्शन खात्यात जमा होण्याची शक्यता आहे. सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची पेन्शन रक्कम सध्या रखडली आहे.

राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेल्या संस्थांमध्ये तसेच निम्न सरकारी कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सेवानिवृत्ती वेतनाला तांत्रिक अडचणींमुळे विलंब झाला आहे.

मार्च एंड आणि ई-कुबेर यंत्रणा अद्ययावतीकरण यामुळे वेळेत निधी न मिळाल्याने ही रक्कम पेन्शनधारकांच्या खात्यावर जमा होऊ शकली नाही. त्यामुळे राज्यातील प्रत्येक कोषागार कार्यालयात त्याबाबत चौकशी करण्यात येत असून, पेन्शन जमा होण्यासाठी वेगवेगळ्या कार्यालयांत सरासरी ६ तारखेचा अवधी लागू शकेल, असे सांगितले जात आहे. राज्यातील २७ कोषागार कार्यालयांमध्ये सुमारे ६ लाख ७५ हजार निवृत्त कर्मचारी आहेत.

सेवानिवृत्त कामगारांचे जीवन निवृत्ती वेतनावर अवलंबून असते. त्यावरच त्यांची उपजीविका असल्याने हे वेतन जमा न झाल्याने अनेक ज्येष्ठांनी कोषागार कार्यालयात धाव घेतली होती.

यातील तांत्रिक अडचण दूर झाली असून, मंगळवारी हा निधी कोषागार कार्यालयांना वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे येत्या दोन दिवसांत पेन्शन खात्यावर वितरित होईल, अशी माहिती अप्पर कोषागार अधिकारी रमेश शिसव यांनी दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# पराभवाच्या हॅटट्रीकने Points Table मध्ये मुंबईच्या नेट रन रेटची लागली वाट! प्लेऑफचा मार्ग आताच खडतर?

इंडियन प्रिमिअर लीग २०२४ च्या १४ व्या सामन्यामध्ये राजस्थान रॉयल्सच्या संघाने २७ बॉल आणि ६ विकेट्स राखून मुंबई इंडियन्सच्या संघाला घरच्या मैदानावर धूळ चारली. हा राजस्थानने जिंकलेला सलग तिसरा सामना ठरला. तर मुंबईने पराभवाची लाजीरवाणी हॅटट्रीक केली आहे. या पराभावामुळे आपल्या १४ सामन्यांपैकी मुंबईने ३ सामने गमावले असून पॉइण्ट्स टेबलमध्ये मुंबई तळाशी आहे. दुसरीकडे तिसऱ्या विजयासहीत संजू सॅमसनच्या नेतृत्वाखालील राजस्थानच्या संघाने पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

राजस्थान नंबर वन

राजस्थानच्या संघाने मुंबईला पराभूत करुन कोलकात्याची पहिले स्थान खेचून घेतले आहे. मुंबई आणि राजस्थानविरुद्धच्या सामान्यानंतर पॉइण्ट्स टेबलमधील अव्वल ३ संघांमध्येच फेरफार झाला आहे. राजस्थान सध्या ३ पैकी ३ विजय मिळवून ६ पॉइण्ट्ससहीत पहिल्या स्थानी आहे. दुसऱ्या स्थानावर कोलकात्याचा संघ आहे. कोलकात्याचा संघ २ सामने जिंकला आहे. पण नेट रन रेटच्या जोरावर ते चेन्नई आणि गुजरात इतके ४ पॉइण्ट्स असूनही दुसऱ्या स्थानी आहेत. चेन्नई सुपर किंग्जच्या संघाला दिल्ली डेअरडेव्हल्सच्या संघाने २० धावांनी पराभूत केल्याने चेन्नईच्या संघाने पॉइण्ट्स टेबलमधील आपलं पहिलं स्थान गमावल्यानंतर दुसऱ्या दिवशी धोनीचा संघ दुसऱ्यावरुन तिसऱ्या स्थानी सरकला आहे. तिसऱ्या स्थानावर चेन्नई सुपर किंग्जचा संघ असून त्यांच्या नावावर एक पराभव आणि २ विजयांची नोंद आहे. चौथ्या स्थानी असलेल्या गुजरातने ३ पैकी २ सामने जिंकले आहेत. सनरायझर्स हैदराबादच्या संघाने आपल्या ३ पैकी १ सामन्यात मोठा विजय मिळवल्याने ते एक सामना जिंकूनही पाचव्या स्थानी आहे. सहाव्या स्थानी २ पैकी एक विजय एका पराभवासहीत लखनऊ सुपर जायंट्सचा संघ आहे.

मुंबई तळाला

सातव्या स्थानी स्पर्धेत रविवारी पहिला विजय मिळवणारा ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्सचा संघ आहे. आठव्या स्थानी पंजाब किंग्स इलेव्हनचा संघ असून नवव्या स्थानी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ आहे. दोन्ही संघांनी आपआपल्या ३ पैकी २ सामने गमावेल असून प्रत्येकी १ सामना जिंकला आहे. पॉइण्ट्स टेबलमध्ये विजयाच्या कॉलममध्ये आणि पॉइण्ट्सच्या कॉलममधील भोपळा न फोडता आलेला मुंबईचा संघ ३ सामन्यानंतरही तळाशी आहे. हा सामना दुपारी साडेचारला सुरु होईल. उणे ०.९२५ वरुन मुंबईचे नेट रन रेट अधिक पडले असून तिसऱ्या पराभवानंतर ते उणे -१.४२३ पर्यंत पडले आहे. मुंबईला नेट रन रेटमध्ये मोठा फटका बसणं स्पर्धेच्या दृष्टीने घातक ठरु शकते. ग्रुप स्टेज संपताना समान पॉइण्ट्स असलेल्या संघांना नेट रन रेटच्या जोरावर टॉप ४ मध्ये जागा मिळते.

मुंबईचा पुढील सामना कधी?

मुंबईचा पुढचा सामना वानखेडेवरच होणार आहे. ७ एप्रिल रोजी होणाऱ्या या सामन्यात मुंबईचा संघ दिल्लीच्या संघाविरुद्ध मैदानात उतरणार असून चौथ्या सामन्यात तरी मुंबईला विजय मिळतो का हे पहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## हार्दिकचे कर्णधारपद जाणार, रोहित पुन्हा मुंबईची धुरा संभाळणार




हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात आयपीएल २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सला अद्याप सूर सापडेलला नाही. मुंबईला पहिल्या तिन्ही सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. मुंबई इंडियन्सला घरच्या मैदानावर राजस्थानविरोधात पराभवाचा सामना करावा लागला. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात मुंबईला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. रोहित शर्मा कर्णधार असताना मुंबईने अनेकदा कमबॅक केले आहे, पण हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात कमबॅक होईल का? याची चर्चा सुरु आहे. रोहित शर्माला पुन्हा मुंबईचं कर्णधारपद देणार, आशा चर्चेला जोर धरला आहे. यामध्येच आता माजी खेळाडूच्या वक्तव्यानं खळबळ माजली आहे. क्रिकबजच्या क्रिकेट कार्यक्रमात मनोज तिवारी यानं रोहित शर्माकडे पुन्हा एकदा मुंबईची धुरा सोपवली जाऊ शकते, असा दावा केला आहे. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

हार्दिक पांड्याला गुजरातच्या संघाकडून मुंबईने ट्रेड केले होते. हार्दिक पांड्याने गुजरातला दोन हंगामात फायनलमध्ये नेलं होतं, त्यामध्ये एकवेळा चषक उंचावला आहे. हार्दिक पांड्याचं नेतृत्वगुण पाहून मुंबईने त्याला ट्रेड केले.

## रोहितचे कर्णधारपद का काढले, हार्दिक पांड्याच्या कॅप्टन्सीबाबात मोठा ट्विस्ट, सिद्धूच्या वक्तव्याने चर्चेला उधाण

आयपीएल २०२४ मध्ये मुंबई इंडियन्स हार्दिक पांड्याच्या नेतृत्वात मैदानात उतरले आहे. आयपीएलच्या १७ व्या हंगामाआधी मुंबई इंडियन्सने रोहित शर्माला कर्णधारपदावरुन काढून टाकत हार्दिककडे धुरा सोपवली होती. पण चाहत्यांना ही गोष्ट रुचली नाही. रोहित शर्माच्या समर्थकांनी हार्दिक पांड्याला हूटिंग तर केलीच, त्याशिवाय मुंबईच्या संघाला सोशल मीडियावर ट्रोल केले. वानखेडे स्टेडियमवर सोमवारी मुंबईचा सामना झाला. या सामन्यावेळीही हार्दिक पांड्याला चाहत्यांच्या रोषाचा सामना करावा लागला. रोहित शर्माची जागा घेणाऱ्या हार्दिक पांड्याची जागा घेण्याच्या निर्णायावर चाहतेच नाही, तर माजी खेळाडूही अवाक झाले आहेत. रोहित शर्माची नेमकी चूक काय होती, की त्याला कर्णधारपदावरुन बाजूला केले? असा प्रश्न माजी खेळाडू नवजोत सिंह सिद्धू यांनी मुंबई इंडियन्सला प्रश्न विचारला. भारताचा हिरो, भारताचा कर्णधार, आपल्या फ्रेंचायजीचा कर्णधार नाही, ही गोष्ट कुणालाच रुचली नाही. रोहित शर्माची नेमकी चूक काय झाली? असाच प्रश्न चाहत्यांना पडला आहे, असे सिद्धू म्हणाले.

रोहित शर्माला हटवून हार्दिक पंड्याकडे मुंबई संघाची धुरा सोपवण्याबाबत फ्रेंचायजीला निशाण्यावर धरलं जातेय. अनेकांच्या मते, मुंबई इंडियन्सने मोठी चूक केली आहे. हार्दिक पांड्या आगामी टी २० विश्वचषकामध्ये भारतीय संघाचं नेतृत्व करणार आशा चर्चा मागील काही महिन्यापूर्वी सुरु होत्या. दुखापतीआधी हार्दिक पांड्या टीम इंडियाच्या टी २० संघाची धुरा संभाळत होता. त्यामुळे जूनमध्ये होणाऱ्या टी २० विश्वचषकात हार्दिक पांड्याच भारतीय संघाची धुरा संभाळेल, असे म्हटले जात होते. आयसीसीने जारी केलेल्या पोस्टरमध्येही हार्दिक पांड्याचा फोटो होता. पण बीसीसीआय सचिव जय शाह यांनी विश्वचषकात रोहित शर्माचं नेतृत्व करणार असल्याचं स्टेसमेंट केले. त्यानंतर सर्व खेळ बदलला.

नवजोत सिंह सिद्धू यांच्या मते, बीसीसीआयकडून रोहित शर्माबाबतची घोषणा आणखी आधी झाली असती, तर मुंबई इंडियन्स हार्दिक पांड्याला कर्णधार केलेच नसते.







## करिश्मा-रवीनाशी जोडले नाव, पहिला चित्रपट झाला हिट... आज बॉलिवूडवर राज्य करतोय 'हा' मुलगा

बॉलिवूडमध्ये असे काहीच कलाकार आहेत ज्यांनी एकामागे एक हिट चित्रपट दिलेत. त्यापैकी एक हा अभिनेता अजय देवगण आहे. अजयने गेल्या अनेक वर्षापासून बॉक्स ऑफिसवर सुपरहिट चित्रपट दिलेत. अजयच्या कामाप्रमाणेच त्याचे खासगी आयुष्य हे तितकंच चर्चेत असते. त्याचे कारण म्हणजे अजयचे नाव इतर अनेक अभिनेत्रींसोबत जोडण्यात येते. आज अजय देवगण हा त्याचा ५४ वा वाढदिवस साजरा करत आहे. याच निमित्ताने आज त्याच्या खासगी आयुष्याविषयी काही खास गोष्टी जाणून घेऊया.

अजय देवगण आणि काजोल हे आनंदी आयुष्य जगत आहेत. ते दोघे अनेकदा एकमेकांचे फोटो आणि व्हिडीओ शेअर करताना दिसतात. त्यांच्या पोस्ट या नेहमीच चर्चेचा विषय ठरतात. पण एक काळ असा होता जेव्हा अजय चर्चेत असण्याचं कारण त्याच्यासोबत काम करणाऱ्या अभिनेत्री होत्या. मीडियामध्ये त्याच्या विषयी अनेक चर्चा सुरु होत्या. अजय देवगणचे नाव हे रवीना टंडन आणि करिश्मा कपूरसोबत जोडण्यात आले होते. सगळ्यात आधी तो रवीनासोबत रिलेशनशिपमध्ये होता अशी चर्चा होती. तर त्यानंतर तो करिशअमा कपूरसोबत रिलेशनशिपमध्ये होता अशी चर्चा सुरु झाली. असे म्हटले जातं की करिश्मा आणि अजय देवगणची जवळीक पाहता अजय आणि रवीनाचा ब्रेकअप झाला होता. त्याशिवाय अजय देवगणचं नाव तब्बू आणि मनीषा कोयरालाशी देखील जोडण्यात आले होते.

अजय देवगन आणि काजोलने काही वर्ष रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर १९९९ मध्ये लग्न केले. त्यानंतर ते आनंदी आयुष्य जगत होते अशात अजय आणि कंगना रणौतच्या रिलेशनशिपच्या चर्चा सुरु झाल्या. त्याचा देखील त्या दोघांच्या नात्यावर परिणाम झाल्याचे म्हटले जाते. वन्स अपॉन ए टाइम इन मुंबईच्या शूटिंग दरम्यान, कंगना आणि अजयमध्ये जवळीक निर्माण झाल्याचे म्हटले जाते.

अजय देवगनच्या करिअरविषयी बोलायचे झाले तर त्याने १९९१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'फूल और कांटे' या चित्रपटातून करिअरची सुरुवात केली. त्याचा हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. आजही त्याचा मोटरसाइकलवर दिलेल्या स्टंटची चर्चा होते. या दरम्यान, अजय देवगणचे अनेक चित्रपट हे हीट झाले आणि प्रेक्षकांच्या मनावर तो राज्य करु लागला. अजयला त्याच्या करिअरमध्ये अनेक पुरस्कार मिळाले. आजही अजय देवगण हा चित्रपटांमध्ये ॲक्शन करताना दिसतो.

## बोनी कपूरने 'नो एंट्री'च्या सीक्वलची केली घोषणा 'मिस्टर इंडिया'बद्दल केला खुलासा

निर्माता बोनी कपूर सध्या आपल्या अनेक प्रोजेक्ट्समुळे चर्चेत आहेत. नुकतीच बातमी आली होती की, बोनी कपूर लवकरच 'नो एंट्री'चा सीक्वेल आणणार आहेत. दरम्यान, आणखी एका सीक्वेलची घोषणा करण्यात आली आहे. अलीकडेच बोनी कपूर यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतील 'मिस्टर इंडिया' या क्लासिक चित्रपटाच्या दुसऱ्या भागाबद्दल एक मोठी अपडेट दिली आहे. बोनी कपूर यांनी त्यांच्या एका मुलाखतीत सांगितलं की,''आम्हाला 'मिस्टर इंडिया'च्या सीक्वेलसाठी अनेक ऑफर्स मिळत आहेत. एका हॉलिवूड स्टुडिओनं आम्हाला एक मोठी ऑफर दिली आहे. तुम्हा सर्वांना एक-दोन वर्षात या चित्रपटाच्या सीक्वेलबद्दल ऐकायला मिळेल.''

अनिल कपूर चित्रपटाच्या कास्टिंगबद्दल नाराज : पुढे त्यांनी सांगितलं, ''माझ्या क्रू सदस्यांना वाटते की 'मिस्टर इंडिया' चित्रपट बनू नये कारण आता श्रीदेवी, अमरीश पुरी आणि सतीश कौशिक यांचे निधन झाले आहे. पण या चित्रपटाबाबत मी आणखी काही योजना आखल्या आहेत.'' नो एंट्री'बद्दल बोलायचं झालं तर वरुण धवन, अर्जुन कपूर आणि दिलजीत दोसांझ या सीक्वेलमध्ये धमाल करताना दिसणार आहेत. मात्र अनिल कपूर चित्रपटाच्या कास्टिंगबद्दल नाराज आहेत. बोनी कपूरनं याबद्दल सांगितलं होतं की, ''अनिल कपूरला या चित्रपटाचा भाग व्हायचे होतं पण त्याच्यासाठी या चित्रपटामध्ये रोल नव्हता. तो आता माझ्याशी नीट बोलत नाही, पण मला आशा आहे की लवकरच सर्व काही ठीक होईल.''

'नो एंट्री' शूटिंग कधी सुरू होईल? : 'नो एंट्री' चित्रपटाचं दिग्दर्शन अनीस बज्मी करणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, चित्रपटाचे शूटिंग या वर्षी डिसेंबरच्या शेवटी सुरू होईल. हा चित्रपट २०२५ मध्ये चित्रपट रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होईल. मात्र, निर्मात्यांनी अद्याप चित्रपटाच्या नायिकेचं नाव उघड केलेले नाही. २००५ मध्ये रिलीज झालेला 'नो एन्ट्री' सुपरहिट ठरला होता. या चित्रपटात सलमान खान, फरदीन खान, अनिल कपूर, बिपाशा बसू, सेलिना जेटली, ईशा देओल, बोमन इराणी आणि लारा दत्ता यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली होती.




## कार्तिकी गायकवाडच्या वडिलांचा संगीतक्षेत्रातील मानाच्या पुरस्काराने सन्मान, लेकीचा आनंद गगनात मावेना; म्हणाली,' 'संत एकनाथ महाराजांचा आशीर्वाद''



'सारेगमप लिटिल चॅम्पस' या कार्यक्रमाची विजेती ठरलेली कार्तिकी गायकवाड सध्या चांगलीच चर्चेत आहे. कार्तिकी लवकरच आई होणार आहे. सोशल मीडियावर ओटीभरण कार्यक्रमाचे फोटो शेअर करत गायिकेने चाहत्यांना आनंदाची बातमी दिली होती. कार्तिकीच्या घरी सध्या आनंदाचं वातावरण आहे. आता या आनंदात आणखी भर पडली आहे. कार्तिकीच्या वडिलांचा संगीतक्षेत्रातील मानाच्या पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. त्यामुळे लेकीचा आनंद गगनात मावेनासा झाला असून वडिलांसाठी तिने सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर केली आहे. त्यामुळे आता लेकीसह वडिलांवरही अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कार्तिकी गायकवाडची पोस्ट काय आहे?

कार्तिकीने इन्सा स्टोरीमध्ये वडिलांचे फोटो शेअर केले आहे. या फोटोंमध्ये कार्तिकीच्या वडिलांचा पुरस्काराने सन्मान होताना दिसून येत आहे. फोटो शेअर करत कार्तिकीने लिहिलं आहे,''१ एप्रिल २०२४ रोजी कल्याणजी गायकवाड यांना श्री संत एकनाथ महाराज स्वर मार्तंड पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. अयोध्येतील श्रीराम मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य गोविंद गिरीजी यांच्या शुभहस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. कल्याणजी गायकवाड यांना मिळालेला हा पुरस्कार म्हणजे साक्षात श्री संत एकथान महाराजांचा आशीर्वादच आहे''. कार्तिकीने या पोस्टद्वारे आपला आनंद व्यक्त केला आहे.

कार्तिकी गायकवाडच्या वडिलांचा संगीतक्षेत्रातील मानाच्या पुरस्काराने सन्मान, लेकीचा आनंद गगनात मावेना; म्हणाली,

पंडीत कल्याणजी गायकवाड यांना 'या' कारणाने मिळाला श्रीसंत एकनाथ महाराज स्वर मार्तंड पुरस्कार

पंडीत कल्याणजी गायकवाड यांनी बालवयापासूनच स्वरांची उपासना केली आहे. मोठ्या कष्टातून स्वरसाधना केली आहे. त्यामुळेच वारकरी भजन क्षेत्रात त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी संगीतबद्ध केलेल्या अभंग-गौळणीच्या चालींनी लोकांना भुरळ घातली आहे. गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी पैठण, आळंदी व पंढरपूरच्या वारीत भजनाची सेवा केली आहे. त्यामुळेच वारकऱ्यांपासून ते प्रसिद्ध गायकांपर्यंत त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. श्री क्षेत्र आळंदी येथे कृष्णाई संगीत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी हजारो गायक घडविले आहेत. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र शासनाच्या कंठ संगीत पुरस्कारासह अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आता यात आणखी एका पुरस्काराची भर पडली आहे.

कार्तिकी गायकवाडच्या वडिलांचा संगीतक्षेत्रातील मानाच्या पुरस्काराने सन्मान, लेकीचा आनंद गगनात मावेना; म्हणाली,

कार्तिकी गायकवाडच्या आवाजाचा मोठा चाहतावर्ग आहे. आपल्या सुमधूर आवाजाने तिने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं आहे. लहानपणापासूनच तिला गाण्याची आवड होती. वडिलांमुळे घरातूनच तिला गाण्याचं बाळकडू मिळालं आहे. कार्तिकी गायकवाडचे वडील पंडित कल्याणजी गायकवाड हे गायक आणि संगीतकार आहेत. एकीकडे आई होणार असल्याने चर्चेत असणारी कार्तिकी आता वडिलांमुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

## 'या' अभिनेत्रीला डेट करतोय आर्यन खान!

बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान हा नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असतो. सध्या त्याचं चर्चेत असण्याचं कारण त्याचं रिलेशनशिप आहे. अशी चर्चा आहे की आर्यन खान हा ब्राझीलची अभिनेत्री लारिसा बोन्सीसोबत रिलेशनशिपमध्ये आहे. एका नेटकऱ्यानं आर्यन खान आणि लारिसा बोन्सीमध्ये जवळीक होत असल्याचे म्हटले आहे.

खरंतर रेडिटवर एका नेटकऱ्यानं आर्यन खानच्या इन्स्टाग्राम अकाऊंटला पाहिल्यानंतर त्याला एक गोष्ट कळली की आर्यन खान हा लारिसाच्या संपूर्ण कुटुंबाला फॉलो करतो. आर्यननं कथितपणे लारिसाच्या आईला तिच्या वाढदिवसाच्या दिवशी गिफ्टही पाठवलं होतं. तिसं तिच्या स्टोरीवर पाहायला मिळालं, असं त्या नेटकऱ्यानं सांगितलं. त्याशिवाय आर्यन आणि लारिसाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

लारिसाच्या कामाविषयी बोलायचे झाले तर ती एक अभिनेत्री आहे. ती गुरु रंधावाच्या 'सूरमा सूरमा' म्युजिक व्हिडीओ, स्टेबिन बेनच्या म्यूजिक व्हिडीओ आणि इतकंच नाही तर विशाल मिश्रासोबत दिसली होती. त्याशिवाय लारिसानं अक्षय कुमार आणि जॉन अब्राहमच्या 'देसी बॉइज'मध्ये काम केलं आहे. त्याशिवाय ती टायगर श्रॉफ, सूरज पंचोलीसोबतही म्यूजिक व्हिडीओमध्ये दिसली होती. लारिसा बोन्सीनं टॉलीवूडमध्ये देखील काम केलं आहे. त्यात 'नेक्स्ट एनी' आणि 'थिक्का' सारखे चित्रपट आहेत. तर बॉलिवूडमध्ये तिच्या करिअरची सुरुवात तिनं सैफ अली खानच्या 'गो गोवा गॉन' या चित्रपटातून केली आहे. आर्यन खानच्या कामाविषयी बोलायचे झाले तर तो 'स्टारडम' या त्याच्या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. या वेब सीरिजमधून आर्यन खान हा दिग्दर्शनात पदार्पण करणार आहे. त्याच्या या वेब सीरिजला पाहण्यासाठी सगळेच उत्सुक आहेत. शाहरुख खानच्या या प्रोजेक्टला घेऊन प्रेक्षक आतुर आहेत. दरम्यान, असं देखील म्हटलं जातं की त्याच्या वेब स्टोरीचे राइट्स घेण्यासाठी काहीही ओटीटी प्लॅटफॉर्म त्याच्याकडे आधीच पोहोचले. तर आर्यन खान त्याच्या या प्रोजेक्टमध्ये शाहरुख खानसोबत काम करत नाही आहे.

## प्रियांका चोप्रासह निक जोनास लॉस एंजेलिसला परतले, फोटो केले शेअर

ग्लोबल स्टार प्रियांका चोप्रा आणि तिचा पती निक जोनास हे नेहमीच चर्चेत असतात. या जोडप्यानं मुलगी मालती मेरीबरोबर भारतात चांगला वेळ घालवला. त्यांनी भारतात होळी देखील साजरी केली. आता हे जोडपे लॉस एंजेलिसला परतले आहे. निक जोनासनं त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर काही फोटो शेअर केले आहेत. त्यानं शेअर केलेले फोटो अनेकांना आवडत आहेत. या फोटोच्या कमेंट्स विभागात अनेकजण कमेंट्स करून त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करत आहेत. अलीकडेच प्रियांकानं सोशल मीडियावर काही सुंदर फोटो शेअर केली आहेत, जी खूप आकर्षक आहेत. याशिवाय तिनं एक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यामध्ये निक आपल्या मुलीबरोबर फिरताना दिसत आहे.

निक जोनासचं लूक : छोट्या व्हिडिओ क्लिपमध्ये, निक हा स्टायलिश आय वेअरसह पांढरा स्वेटशर्टवर आहे. याशिवाय मालती स्ट्रोलरमध्ये बसून असून शहराच्या दृश्याचा आनंद घेत आहे. काही दिवसांपूर्वी प्रियांका चुलत बहीण मन्नारा चोप्राबरोबर तिच्या वाढदिवसाच्या पार्टीत दिसली होती. या वाढदिवसामध्ये तिनं आपल्या कुटुंबाबरोबर अनेक फोटो क्लिक केले होते. प्रियांका आणि निक अनेकदा आपल्या सोशल मीडियावर सुंदर सुंदर फोटो चाहत्यांबरोबर शेअर करत असतात. हे जोडपे सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. प्रियांकाचे इन्स्टाग्रामवर ९१ मिलियन फॉलोअर्स आहेत.

प्रियांका चोप्राचे वर्कफ्रंट : प्रियांका आणि निकनं बरेच दिवस भारतात मुक्कामी होते. यादरम्यान हे जोडपे अयोध्येत श्रीराम मंदिरात दर्शनासाठी गेले होते. यावेळी प्रियांकाची आई मधू चोप्रा देखील तिच्याबरोबर होती. तसेच यानंतर तिनं मुंबईतील प्राइम व्हिडिओच्या इव्हेंटमध्ये देखील हजेरी लावली होती. दरम्यान प्रियांकाच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर ती शेवटी 'लव्ह अगेन' आणि 'सिटाडेल'मध्ये दिसली होती. याशिवाय ती 'हेड्स ऑफ स्टेट'चा एक भाग आहे. बॉलिवूडमध्ये प्रियांका दिग्दर्शक फरहान अख्तरच्या 'जी ले जरा ' या चित्रपटामध्ये झळकेल. तसेच ती कल्पना चावला बायोपिकमध्ये मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

## 'दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात खासदार संजय सिंह यांना जामीन मंजूर

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांना अखेर सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने त्यांना हा जामीन मंजूर केला. दिल्ली दारू धोरणाशी संबंधित घोटाळ्याप्रकरणी ते ६ महिने ते तुरुंगात होते. दरम्यान, न्यायालयाच्या निर्णयानुसार संजय सिंह यांना राजकीय कार्यातही सहभागी होता येणार आहे. त्यामुळे लोकसभेच्या निवडणुकांमध्ये 'आप'ला मोठा दिलासा मिळाला आहे.

ईडीकडून हरकत नाही : सर्वोच्च न्यायालयाचे तीन न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती पी बी वराळे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. खंडपीठाने ईडीला विचारलं होतं की, संजय सिंह यांना अजूनही तुरुंगात ठेवण्याची गरज आहे का? संजय सिंह यांच्या वकिलाने न्यायालयाला सांगितलं होतं की, मनी लाँड्रिंगची पुष्टी झालेली नाही आणि मनी ट्रेल देखील सापडलेला नाही. असं असतानाही संजय सिंह ६ महिन्यांपासून तुरुंगात आहेत. यावर ईडीकडून कोणतंही उत्तर मिळाले नाही. तसंच, सिंह यांना जामीन मंजूर करण्यासही ईडीकडून हरकत घेण्यात आली नाही.

नऊ जबाबांमध्ये संजय सिंह यांचे नाव घेतले नाही : मनी लाँड्रिंग प्रकरणात अटक आणि रिमांडला आव्हान देणाऱ्या सिंह यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आप खासदाराच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरला की, संजय सिंह यांच्या ताब्यातून एकही पैसा जप्त करण्यात आलेला नाही. तसंच, त्यांच्याविरुद्ध २ कोटी रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपांची चौकशी केली जाऊ शकते. दरम्यान, गेल्या सुनावणीत, संजय सिंह यांच्या बाजूने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सांगितले होते की, अंमलबजावणी संचालनालय (ईडी) प्रमुख साक्षीदार दिनेश अरोरा यांनी त्यांच्या आधीच्या नऊ जबाबांमध्ये संजय सिंह यांचे नाव घेतले नव्हते. सिंघवी यांनी न्यायालयात सांगितले होते की, जोपर्यंत मान्यता मिळत नाही तोपर्यंत त्यांची साक्ष विश्वासार्ह नाही.

काय आहे प्रकरण : १९ जुलै २०२३ रोजी अनुमोदक बनलेल्या दिनेश अरोरा यांच्या विधानात संजय सिंह यांचं नाव प्रथमच आलं. १६४ च्या निवेदनातही नाव घेतलं नाही. संजय सिंह यांनी ईडीच्या विरोधात (मानहानी) तक्रार दाखल केली आणि त्यानंतर ईडीने त्यांना समन्स न बजावता अटक केली. हायकोर्टाने (दि. ७ फेब्रुवारी) रोजी सिंह यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. परंतु, सुनावणी सुरू झाल्यानंतर कनिष्ठ न्यायालयाला लवकरात लवकर निकाल देण्याचे निर्देश दिले होते. या प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (दि. ४ ऑक्टोबर २०२३) रोजी सिंह यांना अटक केली होती.

## राहुल गांधींच्या टीकेला पंतप्रधान मोदींचे प्रत्युत्तर;

**दिल्ली :** लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभा आता संबंध देशभरात सुरू आहेत. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर टीकास्र सोडत आहेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी दोन दिवसांपूर्वी भाजपावर टीका केली होती. पतंप्रधान नरेंद्र मोदी हे उत्तराखंडच्या दौऱ्यावर असताना त्यांनी या टीकेला उत्तर दिले. ते म्हणाले, ''विरोधकांमधील शाही कुटुंबातील राजकुमार म्हणतात की, भाजपाला तिसऱ्यांदा सत्ता मिळाल्यानंतर देशभरात आगडोंब पसरेल. ते स्वत: ६० वर्ष सत्तेत होते. मात्र फक्त १० वर्ष सत्तेबाहेर राहिल्यानंतर त्यांना देशात आगडोंब पसरण्याइतपत भाषा वापरावी लागत आहे.''

उत्तराखंडच्या रुद्रपूर येथे जाहीर सभेला संबोधित करत असताना पंतप्रधान मोदी यांनी राहुल गांधींच्या टीकेचा समाचार घेतला.

# तैवानमध्ये जोरदार भूकंपाचा धक्का

### ७.२ रिश्टर स्केल इतकी तीव्रता, त्सुनामीचा इशारा



तैवानची राजधानी तैपेईमध्ये बुधवारी जोरदारभूकंपाचाधक्का बसला. याभूकंपाचीतीव्रता रिश्टर स्केलवर ७.२ इतकी मोजण्यात आली. भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला असून देशभरातील रेल्वे सेवा बंद करण्यात आली आहे.-ऊ्रएठढखडएचएछ्ढतैवान सरकारने जारी केलेल्या अपडेटनुसार, बुधवारी पहाटे तैवानची राजधानी तैपेईमध्ये हा भूकंप झाला. या भूकंपाचा केंद्रबिंदू तैवानच्या हुआलियन शहरापासून सुमारे १८ किलोमीटर अंतरावर असल्याचे सांगण्यात येते. या भूकंपामुळे त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे.समुद्रात ३ मीटर (९.८ फूट) उंचीपर्यंत लाटा उसळण्याची शक्यता आहे. हवामान खात्यानेजपानमध्येत्सुनामीचा इशाराही जारी केला आहे. लोकांना समुद्रकिनाऱ्यांपासून दूर राहण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. देशभरातील बचावकार्य पथकांना सतर्क करण्यात आले आहे. सोशल मीडियातून समोर आलेल्या व्हिडीओनुसार, याभूकंपानंकर अनेक इमारती कोसळल्या आहेत. पूल आणि रस्त्यांवरील वाहने हालताना दिसले. आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त समोर आले नाही. मात्र, मोठ्या प्रमाणातवित्तहानी झाल्याचे दिसून येत आहे. भूकंपानंतर जपानमध्येत्सुनामीचा इशारा तैवानमधील भूकंपानंतर जपानमध्ये त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे. जपानचे म्हणणे आहे की, ओकिनावा प्रांताच्या आसपासच्या किनारी भागासाठी त्सुनामीचा इशारा देण्यात आला आहे. या त्सुनामी लाटा तीन मीटरपर्यंत उंच असू शकतात. फिलीपिन्समध्येही सतर्कतेचा इशारा. त्सुनामीची शक्यता लक्षात घेऊन फिलीपिन्समध्येही सतर्कतेचा इशारा दिला आहे. फिलीपिन्सच्या भूकंप विज्ञान संस्थेने अनेक प्रांतांच्या किनारी भागासाठी त्सुनामीचा इशारा जारी केला आहे. येथे राहणाऱ्या लोकांना उंच भागात जाण्यास सांगितले आहे.भूकंप का येतात?


पृथ्वीच्या आत सात प्लेट्स आहेत, ज्या सतत फिरत असतात. ज्या भागात या प्लेट्स आदळतात त्याला फॉल्ट लाइन म्हणतात. प्लेट्सचे कोपरे वारंवार टक्कर झाल्यामुळे वाकतात. जेव्हा जास्त दाब तयार होतो, तेव्हा प्लेट्स तुटू लागतात. खालील उर्जा बाहेर पडण्याचा मार्ग शोधते आणि त्यानंतर भूकंप होतो.

# सी - व्हीजल ॲपवर तक्रारींचा पाऊस; १८ दिवसांत १३३ तक्रारी; ३४ तक्रारींचा १०० मिनटात निपटार

**ठाणे :** लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या या ॲपवर अवघ्या १८ दिवसात १३३ तक्रारी प्राप्त झाल्या असून यामध्ये ४ त्कारारी या लेखी स्वरूपातील आहे. त्यापैकी ३४ तक्रारींचा अवघ्या १०० मिनिटात निपटारा करण्यात आला आहे. या ॲपवर तक्रारी करतांना सेल्फी फोटो काढून अपलोड करण्यात आले असल्याचे देखिल आढळून आल्याची माहिती जिल्हानिवडणूकविभागाच्यावतीने देण्यात आली.-ऊ्रएठढखडएचएछ्ढलोकसभा निवडणुकीच्या घोषणेमुळेठाणेजिल्ह्यातही आदर्श आचारसंहिता लागू झाली असून तिचे काटेकोर पालन करण्यासाठी जिल्हा निवडणूक विभाग सज्ज झाला आहे. जिल्ह्यातील तीन लोकसभा मतदार संघासाठी २० मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता लागून करण्यात आली असून त्याचे काटेकोर पालन करण्यासाठी आदर्श आचारसंहितेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सी व्हिजील या मोबाईल ॲपचा वापर करण्यात येत आहे. नागरिकांना एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्या प्रसंगाचे या ॲपमध्ये छायाचित्र अथवा व्हीडीओ काढून तक्रार नोंदविली जात आहे. या तक्रारी नोंदविताना अनेकदा तक्रारदार हे त्या प्रसंगाचे फोटो काढून तो दुसऱ्या ठिकाणाहून अपलोड करत आहे. त्यामुळे तक्रारींचा निपटारा करण्यासाठी अधिकचा वेळ खर्ची पडत आहे.असे असले तरी, सी - व्हीजील ॲपवर प्राप्त झालेल्या १३३ तक्रारींपैकी ३४ तक्रारींचा १०० मिनिटात निपटारा करण्यात आला आहे.

**पोस्टर, फलकाबाबत तक्रारीच अधिक**

**१६ मार्च पासून लागू झालेल्या आचारसंहिता भंगाच्या आतापर्यंत १८ दिवसात सी व्हिजील ॲपवर १३३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी ३४ तक्रारी अवघ्या १०० मिनीटात कारवाई करण्यात आली. या तक्रारींमध्ये राजकीय पोस्टर, फलकबाजी तसेच मोबाईलवरील जाहिराती आदींचा समावेश आहे.**



तर, १०३ तक्रारींवरील कारवाई पूर्ण करून तक्रारी निकाली काढण्यात आल्या असल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली.

सेल्फी फोटोंमुळे कर्मचारी आवाक

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर आचारसंहिता भंगाच्या तक्रारीसाठी सुरु करण्यात आलेल्या सी व्हिजील ॲपवर तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या ॲपवर तक्रारींचा फोटो टाकताना तक्रारदारांनी

# इस्त्रायलकडून पुन्हा गाझापट्टीत हवाई हल्ला

**भारतीय वंशाच्या महिलेचा मृत्यू; एकूण सातजण ठार**

इस्त्रायल आणि हमास यांच्यात सुरु असलेलेयुद्धकाही केल्या संपायचे नाव घेत नाहीये. उलट दिवसेंदिवस यायुद्धाचीतीव्रता आणि त्यामुळे होणारे नुकसान चिंताजनक आहे. गाझा पट्टीत सातत्याने केल्या जात असलेल्या हल्ल्यांमध्ये केवळ स्थानिक नागरिकच नव्हे तर विदेशी नागरिकांनाही आपला जीव गमवावा लागत आहे .इस्त्रायलन `केलेल्या ताज्या हवाई हल्ल्यात वर्ल्ड सेंट्रल किचनमधील आंतरराष्ट्रीय स्तरावरील रिलीफ कर्मचारी ठार झाले. महत्त्वाची बाब म्हणजे, त्यातभारतीयवंशाच्या लालजावमी फ्रँककॉम या महिलेचा समावेश आहे.ऊ्रएठढखडएचएछ्ढऑस्ट्रेलियन पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी पुष्टी केली की ४३ वर्षीय फ्रँककॉम यांचा ठार झालेल्या ६ नागरिकांच्यात समावेश आहे. तसेच घटनेची संपूर्ण जबाबदारी इस्त्रायल सरकारने घ्यावी अशी मागणीही त्यांनी केली आहे. ते म्हणाले की, वर्ल्ड सेंट्रल किचनमधील सहा आंतरराष्ट्रीय मदत कर्मचारी युद्धग्रस्त गाझा भागातील लोकांना मदत करण्यासाठी स्वयंसेवा (तेर्श्रीपींशशी) करत आहेत. अशा मदतनीसांना ठार करणे स्वीकारार्ह नाही. म्हणूनच या हल्ल्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे अशी आम्ही मागणी करतो.मीडिया रिपोर्ट्सनुसार, ऑस्ट्रेलियन वडील आणि मिझोरमधील आई यांच्या पोटी जन्मलेली फ्रँककॉम युद्धग्रस्त उत्तर गाझामधील लोकांना मदत करण्याच्या मोहिमेवर काम करत होती, परंतु सोमवारी रात्री उशिरा इस्त्रायली हवाई हल्ल्यात तिचा



मृत्यू झाला. इस्त्रायलचे पंतप्रधान



**कराड : महामार्गावर पादचारी पुलामध्ये अडकललो कंटेनर**

# केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची राहूल गांधींवर टीका

**बंगळूरु :** राहुल गांधी संसदेत म्हणायचे की, जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवू नका, रक्ताच्या नद्या वाहतील. पण, आमच्या सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० हटवले. राहुल बाबा, आता रक्ताच्या नद्या सोडा, तिकडे दगड फेकण्याचीही कुणाची हिम्मत होत नाही. आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भक्कम नेतृत्वात लढत आहोत, तर दुसरीकडे घराणेशाही असलेली भ्रष्ट इंडीया आघाडी असल्याचे सांगत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी इंडिया आघाडी, राहूल गांधींसह काँग्रेसवर घणाघाती टीका केली.

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रमुख नेते देशभरात विविध ठिकाणी सभा, कार्यक्रम घेत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी बंगळुरुमध्ये सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. तसेच, कर्नाटकात भाजप सर्व २८ जागा जिंकेल, असा विश्वासही व्यक्त केला.

यावेळी शाह यांनी राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यावरही टीका केली. ते म्हणाले, 'संपूर्ण जगात नरेंद्र मोदी एकमेव व्यक्ती आहेत, ज्यांनी २३ वर्षांपासून मुख्यमंत्री आणि पंतप्रधान असताना एकही दिवस सुट्टी न घेता अहोरात्र जनतेची सेवा केली आहे. तर दुसरीकडे राहुल बाबा आहेत. हे दर उन्हाळ्यात परदेशात फिरायला जातात आणि इकडे काँग्रेसवाले सहा महिने त्यांना शोधत बसतात.'

एका बाजूला नरेंद्र मोदी आहेत, ज्यांनी २३ वर्षे मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून काम केले. २३ वर्षात विरोधकांना मोदींवर २५ पैशांचाही भ्रष्टाचाराचा आरोप करता आला नाही. २३ वर्षापासून मोदींनी पारदर्शकतेचा आदर्श देशात ठेवला आहे. दुसरीकडे भ्रष्टाचाराची ही 'अहंकारी' आघाडी आहे. काँग्रेसने सोनिया-मनमोहन यांच्या काळात १२ लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्याचे गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितले.

## दिल्ली उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात खासदार संजय सिंह यांना जामीन मंजूर

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांना अखेर सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने त्यांना हा जामीन मंजूर केला. दिल्ली दारू धोरणाशी संबंधित घोटाळ्याप्रकरणी ते ६ महिने ते तुरुंगात होते. दरम्यान, न्यायालयाच्या निर्णयानुसार संजय सिंह यांना राजकीय कार्यातही सहभागी होता येणार आहे. त्यामुळे लोकसभेच्या निवडणुकांमध्ये 'आप'ला मोठा दिलासा मिळाला आहे.

ईडीकडून हरकत नाही : सर्वोच्च न्यायालयाचे तीन न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती पी बी वराळे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. खंडपीठाने ईडीला विचारलं होतं की, संजय सिंह यांना अजूनही तुरुंगात ठेवण्याची गरज आहे का? संजय सिंह यांच्या वकिलाने न्यायालयाला सांगितलं होतं की, मनी लाँड्रिंगची पुष्टी झालेली नाही आणि मनी ट्रेल देखील सापडलेला नाही. असं असतानाही संजय सिंह ६ महिन्यांपासून तुरुंगात आहेत. यावर ईडीकडून कोणतंही उत्तर मिळाले नाही. तसंच, सिंह यांना जामीन मंजूर करण्यासही ईडीकडून हरकत घेण्यात आली नाही.

नऊ जबाबांमध्ये संजय सिंह यांचे नाव घेतले नाही : मनी लाँड्रिंग प्रकरणात अटक आणि रिमांडला आव्हान देणाऱ्या सिंह यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आप खासदाराच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरला की, संजय सिंह यांच्या ताब्यातून एकही पैसा जप्त करण्यात आलेला नाही. तसंच, त्यांच्याविरुद्ध २ कोटी रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपांची चौकशी केली जाऊ शकते. दरम्यान, गेल्या सुनावणीत, संजय सिंह यांच्या बाजूने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सांगितले होते की, अंमलबजावणी संचालनालय (ईडी) प्रमुख साक्षीदार दिनेश अरोरा यांनी त्यांच्या आधीच्या नऊ जबाबांमध्ये संजय सिंह यांचे नाव घेतले नव्हते. सिंघवी यांनी न्यायालयात सांगितले होते की, जोपर्यंत मान्यता मिळत नाही तोपर्यंत त्यांची साक्ष विश्वासार्ह नाही.

**काय आहे प्रकरण :** १९ जुलै २०२३ रोजी अनुमोदक बनलेल्या दिनेश अरोरा यांच्या विधानात संजय सिंह यांचं नाव प्रथमच आलं. १६४ च्या निवेदनातही नाव घेतलं नाही. संजय सिंह यांनी ईडीच्या विरोधात (मानहानी) तक्रार दाखल केली आणि त्यानंतर ईडीने त्यांना समन्स न बजावता अटक केली. हायकोर्टाने (दि. ७ फेब्रुवारी) रोजी सिंह यांचा जामीन अर्ज फ `टाळला होता. परंतु, सुनावणी सुरू झाल्यानंतर कनिष्ठ न्यायालयाला लवकरात लवकर निकाल देण्याचे निर्देश दिले होते. या प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (दि. ४ ऑक्टोबर २०२३) रोजी सिंह यांना अटक केली होती.

## क्षत्रिय-दलित वादावरून गुजरातमध्ये भाजपा अडचणीत!

नवी दिल्ली :पंतप्रधानांचे गृहराज्य गुजरातमध्ये जातीय वादावरून भाजपा अडचणीत आली आहे. गुजरात भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि राजकोट लोकसभा मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार केंद्रीय मंत्री पुरुषोत्तम रुपाला वादाच्या भोर्वयात अडकले आहेत. पाटीदार समाजातून आलेले पुरुषोत्तम रुपाला केंद्रातील केंद्रीय मत्स्य पालन, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय मंत्री आहेत. त्यांना ५ मार्च रोजी गुजरातमधील राजकोट येथून उमेदवारी जाहीर करण्यात आली. उमेदवारी जाहीर होताच त्यांच्या समर्थकांसह खासदार मोहन कुंडारिया आणि भाजपा कार्यकर्त्यांनी जल्लोषात त्यांचे स्वागत केले.

त्यांनी एका प्रचार सभेदरम्यान केलेल्या वक्तव्याने मोठ्या वादाचे रूप घेतले. गुजरातमध्ये क्षत्रिय किंवा राजपूत समाजाची संख्या लक्षणीय आहे. अनेक काळापासून भाजपालादेखील या समाजाचा पाठिंबा मिळत आला आहे. याच समाजाविरोधात वादग्रस्त वक्तव्य केल्याने रूपाला यांचा विरोध होत आहे. लोकसभा निवडणूक जवळ आली आहे आणि दिवसेंदिवस हा विरोध वाढत असल्याने, भाजपाच्या अडचणी वाढताना दिसत आहेत.

रुपाला यांच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या प्रमुख क्षत्रिय चेहऱ्यांमध्ये अखिल गुजरात राजपूत युवा संघाचे अध्यक्ष पी. टी. जडेजा, महिला करणी सेना गुजरातच्या अध्यक्षा पद्मिनीबा वाला, क्षत्रिय करणी सेनेचे प्रमुख राज शेखावत आणि करणी सेना गुजरातचे अध्यक्ष जे. पी. जडेजा यांचा समावेश आहे.

# मानकुराद आंबा आता बाजारात २ हजार रुपये



राज्यात मानकुराद मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जात आहे. बहुतांश लोकांनी मानकुराद आंब्याच्या बागायती केल्या आहेत. पण मानकुरादची यंदा लागवड कमी झाली आहे. त्यामुळे दरही चढे आहेत. गेल्या वर्षी आंब्याची आवक जास्त होती. त्यामुळे आंबे १ हजार पर्यंत आले होते. पण अजून आवक वाढली नसल्याने अजून दर चढेच आहे. मानकुराद २ हजार प्रती डझन घेणे तसे सर्वसामान्यांना न परवडणारे आहे. किमान १ हजारच्या खाली दर असता तर सर्वसामान्य लोकांनी खरेदी केले असते. त्यामुळे लोकांना आणखी काही दिवस प्रतिक्षा करावी लागणार आहे. एप्रिलच्या १५ नंतर आवक वाढल्यावर मानकुरादचा दर आणखी कमी होऊ शकतो, असे आंबे विक्रेत्यांकडून सांगितले जात आहे.

**पणजी :** राज्यात आता आंब्याची आवक वाढू लागल्याने हळूहळू किमती खाली येत आहेत. सुरुवातीला ४ ते ५ हजार प्रती डजनने विकला जाणारा मानकुराद आंबा आता बाजारात २ हजार रुपये डझनने विकले जात आहेत. तसेच हापूस सुरुवातीला २ हजार रुपये प्रती डझन होता आता ७०० रुपये वर आला आहे. आंब्याचा किमती आणखी खाली येण्याची शक्यता आहे.

यंदा आंब्याचा उत्पादन कमी असल्याचे अनेक आंबे उत्पादकांकडून सांगितले जात आहे. तरीही आता मार्केटमध्ये मानकुराद आंबे यायला सुरुवात झाली आहे. तर हापूस आंबे रत्नागिरीहून आयात केले जात आहेत. फेब्रुवारी मार्चमध्ये याच्या किमती दुपट्ट होत्या त्या आता खाली आल्या आहेत. तसेच आता आणखी खाली येण्याची शक्यता आहे. जसजशी आवक वाढते तशा किमती खाली येत असतात.

# १२ एप्रिलला कृती आराखडा द्या, ३१ मे पर्यंत मार्गी लावा: हायकोर्टाचे निर्देश




**पणजी :** पणजी स्मार्ट सीटीच्या कामांचा कृती आराखडा १२ एप्रिल पर्यंत सादर करण्याचा आदेश मुंबईउच्च न्यायालयाच्यागोवा खंडपीठाने इमेजीन गोवा पणजी स्मार्ट सीटी महामंडळाला दिला आहे. तसेच सर्व कामे ३१ मे पर्यंत आटोपली पाहिजेत असेही सांगितले आहे.

पणजी स्मार्ट सीटीच्या रखडलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी १ एप्रील रोजीउच्च न्यायालयाचेन्यायाधीश महेश सोनक आणि न्यायमूर्ती वाल्मिकी मिनेझीस हे पणजीतील रस्त्यावर स्वत: फिरले होते. पाहणी केल्यानंतर स्मार्ट सीटी प्रकल्पाचे सीईओ संजित रॉड्रिगीश यांना न्यायाधीशांनी काही महत्त्वाच्या सुचनाही केल्या होत्या. तसेच बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी स्मार्ट सीटीची कोणती कामे केव्हा पर्यंत तडीस लावली जातील या विषयी सविस्तर कृती आराखडा न्यायालयाला १२एप्रील रोजी देण्याचा आदेशही दिला आहे. तसेच कृती आराखड्याची अंमलबजावणी ही महामंडळाने दिलेल्या तारखेलाच म्हणजे ३१ मे पर्यंत झालीच पाहिजे असेही न्यायालयो म्हटले आहे. या प्रकरणात पुढील सुनावणी ही १६ एप्रील रोजी ठेवण्यात आली आहे.स्मार्टसीटीच्या रखडलेल्या कामांमुळे पणजी शहरात धूळप्रदूषणझाल्यामुळे लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचा दावा करून दोघा स्थानिक नागरीकांनी न्यायालयात धाव घेतली होती. धूळप्रदूषणावरलक्ष्य ठेवण्यासाठी शहरात काही ठिकाणी प्रदूषणाची मात्रा दर्षविणारी डिजिटल यंत्रणे लावण्यात यावीत असा आदेशही न्यायालयाने दिला होता.